नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५५ * अंक १९१ * * नागपूर * रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त





नागपुर महानगरपालिका के
**4407**
अधिकांश सफाई कर्मचारियों को सरकार से मिलेगी बड़ी राहत
**लाड पागे समिति की सिफारिशों के मिलेंगे लाभ**
ऐसा निर्णय लेने के लिए जो श्रमिकों के जीवन में नई ऊर्जा लाए




**मा. श्री. देवेंद्र जी फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. एकनाथ जी शिंदे**
उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. अजितदादा पवार**
उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री, महाराष्ट्र राज्य

इनका मनःपूर्वक
**आभार!**




**प्रवीण प्रभाकरराव दटके**
आमदार, मध्य नागपुर विधानसभा


**संदीपजी दिवाकरराव जोशी**
आमदार, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य

भारतीय जनता पार्टी, मध्य नागपुर की ओर से तथा सभी पूर्व और वर्तमान जनप्रतिनिधियों और जनता की ओर से हार्दिक धन्यवाद!

SPECTRUM

## १ जुलैनंतर नावनोंदणी केलेल्या मतदारांना यंदा मतदानाचा अधिकार नाही

# मनपा निवडणुकीत राज्य आयोगाची मतदारयादीच ग्राह्य

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केलेली 1 जुलै 2025 रोजीची मतदारयादीच वापरली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे त्यानंतर मतदार नावनोंदणी केलेल्या नागरिकांना मतदानाचा अधिकार या निवडणुकीत मिळणार नाही. आयोगाच्या माहितीनुसार, यंदाच्या निवडणुकीत सुमारे 35 लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

यापूर्वीच्या महापालिका निवडणुकांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मतदारांची यादी घेऊन प्रभागनिहाय आणि मतदान केंद्रनिहाय फोड करण्यात येत असे. मात्र, या वेळी राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट आदेश जारी केले आहेत की, स्थानिक प्रशासनाने स्वतंत्र मतदारयादी वापरू नये. फक्त आयोगाकडून पुरवलेली अधिकृत यादीच निवडणुकीसाठी ग्राह्य धरावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून स्वतंत्र यादी घेतली जाणार नाही, तर राज्य निवडणूक आयोगाने पाठवलेली अंतिम यादीच



निवडणुकीचा आधार ठरणार आहे.

निवडणूक अधिकारी प्रसाद काटकर यांनी माहिती दिली की, राज्य निवडणूक आयोगाकडून मतदारयादी महापालिकेला प्राप्त झाली आहे. आता ती प्रभागनिहाय फोडण्याचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे. पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी 1 जुलै 2025 रोजी अंतिम करण्यात आलेली यादीच वापरली जाणार आहे, असे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, आयोगाने याच यादीचा वापर राज्यातील इतर महापालिकांच्या निवडणुकांसाठीही करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्वत्र एकाच तारखेनुसार अंतिम यादी लागू राहील.

1 जुलैनंतर मतदार म्हणून नावनोंदणी केलेल्या नागरिकांना या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळणार नाही. यामुळे गेल्या काही महिन्यांपासून वयाची अट पूर्ण करून नावनोंदणी केलेल्या नव्या मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागणार आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, ही बाब अनेक मतदारसंघांमध्ये तरुण मतदारांवर परिणाम करणारी ठरू शकते, असे नमूद करण्यात येत आहे.

### निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात

निवडणुकीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. निवडणूक आयोगाकडून लवकरच आचारसंहितेची अंमलबजावणी होण्याची शक्यता असून, त्यानंतर काही आठवड्यांतच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रसाद काटकर यांनी सांगितले की, महापालिकेच्या निवडणुकीसाठी सर्व तयारी सुरू असून, आयोगाकडून वेळापत्रक मिळताच प्रशासन तातडीने कृती आराखडा अमलात आणेल. निवडणूक पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरळीत पार पडावी यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहे, असे ते म्हणाले.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी अंतिम प्रभागरचनेला राज्य सरकारकडून मान्यता मिळालेली आहे. पुढील काही दिवसांत प्रभागनिहाय आरक्षण जाहीर केले जाण्याची शक्यता आहे. आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणुकीसाठी अधिकृत प्रशिक्षण प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. अधिकारी व कर्मचारी यांना मतदान केंद्र, मतमोजणी केंद्र आणि निवडणूक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

या निवडणुकीतही 2011 च्या लोकसंख्येचा आधार घेतला जाणार आहे. पुणे महापालिकेच्या 2017 च्या निवडणुकीनुसार 41 प्रभाग होते. या वेळीही 41 प्रभागांमधून 165 नगरसेवक निवडून दिले जाणार आहेत. यामध्ये 40 प्रभाग हे चार सदस्यांचे, तर एक प्रभाग पाच सदस्यांचा राहणार आहे. प्रभाग क्रमांक 38 बालाजीनगर, कात्रज आणि आंबेगाव हा सर्वांत मोठा प्रभाग असून, येथील लोकसंख्या 1 लाख 23 हजार इतकी आहे. त्यामुळे या प्रभागातून पाच नगरसेवक निवडून येणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या यादीनुसार पुणे शहरातील एकूण मतदारसंख्या सुमारे 35 लाखांच्या घरात आहे. यात जवळपास 18 लाख पुरुष आणि 17 लाख महिला मतदार आहेत. मागील निवडणुकीच्या तुलनेत ही संख्या सुमारे दीड लाखांनी वाढली आहे. प्रभागनिहाय फोडणी पूर्ण झाल्यावर प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदारसंख्या जाहीर केली जाणार आहे.

## छोटा राजनचा साथीदार कुख्यात गुंड डी.के. रावला पुन्हा अटक



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनचा दीर्घकाळचा साथीदार आणि कुख्यात गुंड रवी मल्लेश बोऱ्हा उर्फ डी.के. राव याला पुन्हा एकदा मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. एका गुंतवणूकदाराला खंडणीसाठी धमकवण्याच्या प्रकरणात त्याच्यासह दोन अन्य विकासकांना, मिमित भुता आणि अनिल परेराव यांना अटक करण्यात आली आहे. या तिघांना न्यायालयात हजर केले जाणार आहे. गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना मागील वर्षीची असली तरी तक्रार नुकतीच नोंदवण्यात आली. या प्रकरणात एका बिल्डरने गुंतवणूकदारांची सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक केली होती. गुंतवणूकदारांनी पैसे मागितल्यावर विकासकांनी डी.के. रावची मदत घेऊन त्यांना धमकवण्याचा प्रयत्न केला. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, या दोन्ही विकासकांनी गुंतवणूकदारांकडून पैसे घेतले, मात्र प्रकल्प पूर्ण केला नाही. जेव्हा गुंतवणूकदारांनी परतफेड मागितली, तेव्हा विकासकांनी डी.के. रावला मध्ये टाकून दडपशाही करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी दोन्ही विकासक आणि डी.के. राव यांना अटक करून न्यायालयात सादर करण्याची तयारी सुरू केली आहे.

## एसयूडी लाइफकडुन एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

एसयूडी लाइफ इन्शुरन्सने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे, हा एक नवीन फंड ऑफर आहे जो निफ्टी अल्फा ५० इंडेक्सचा मागोवा घेते, भारतातील सर्वाधिक सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या शेअर्सची ओळख करून देणारा स्मार्ट बीटा बेंचमार्क आहे. नवीन फंड ऑफर (एनएफओ) ६ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत खुला आहे.

हा निर्देशांक भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक तरल कंपन्यांमधील अव्वल ५० शेअर्सचा समावेश करतो. हे शेअर्स त्यांच्या "अल्फा"च्या आधारे निवडले जातात , जे त्यांच्या अल्फाच्या आधारे निवडले जातात, जे जोखीम समायोजित केल्यानंतर व्यापक बाजारपेठेपेक्षा चांगले प्रदर्शन करण्याची प्रत्येक स्टॉकची क्षमता मोजते. निर्देशांकातील प्रत्येक स्टॉकचे वजन त्याच्या अल्फा स्कोअरद्वारे निश्चित केले जाते, ज्यामुळे परिमाणात्मक विश्लेषणावर आधारित कामगिरी-केंद्रित पोर्टफोलिओ तयार होतो.

या लाँचबद्दल बोलताना, एसयूडी लाईफचे मुख्य गुंतवणूक अधिकारी श्री. प्रशांत शर्मा म्हणाले - "हा फंड गुंतवणूकदारांना इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्याच्या अधिक विचारशील पद्धतीची सुविधा देण्याबद्दल आहे. केवळ बाजाराच्या आकाराचा मागोवा घेण्याऐवजी, ते कालांतराने चांगले परतावा देण्याची क्षमता दर्शविणाऱ्या कंपन्यांच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करते. ही कल्पना सोपी आहे, पद्धतशीर राहणे, गुंतवणूक करत राहणे आणि डेटाला निर्णय घेण्यास परवानगी देणे. युलिप शुल्कावरील ०% जीएसटीच्या अतिरिक्त फायद्यासह, पॉलिसीधारक आता कार्यक्षमता आणि संभाव्य वाढीचा आनंद घेऊ शकतात."

बाजारातील बदलत्या गतिमानतेनुसार चपळता सुनिश्चित करून, निर्देशांक तिमाहीत पुनसंर्तुलित केला जातो.हा फंड क्षेत्रनिरपेक्ष दृष्टिकोनासह सातत्यपूर्ण अल्फा साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवतो, ज्यामुळे जोखीम संतुलित ठेवत संपूर्ण अर्थव्यवस्थेतील संधींचा लाभ घेता येतो. मिड-कॅप बायस आणि उच्च-अल्फा घटकांवर लक्ष केंद्रित करून, हा फंड इक्विटी गुंतवणुकीसाठी स्मार्ट, डेटा-नेतृत्वाच्या दृष्टिकोनाद्वारे भारताच्या विकासाच्या कथेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पॉलिसीधारकांसाठी योग्य आहे.

# अजित पवार यांचा खडकवासला दौरा

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामांचा आढावा घेतला. पहाटेपासून सुरू झालेल्या या दौऱ्यात त्यांनी वारजे, आहिरेगाव, धायरी आणि नांदेड सिटी परिसरातील प्रकल्पांची पाहणी केली. या वेळी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



अजित पवार यांनी वारजेतील चौधरी चौक येथून पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुर्दशा, आणि नागरिकांच्या तक्रारी या विषयांवर त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. विकासकामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, नागरिकांना अडचण होणार नाही याची दक्षता घ्या, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्यास शिवणे पूल पाण्याखाली जातो. त्यामुळे पूल उंच करण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले. वारजे-शिवणे पुलाची तसेच धायरी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या धायरी डीपी रोड आणि कात्रज चौकातील उड्डाणपूल कामांची त्यांनी सविस्तर पाहणी केली.

आहिरेगाव परिसरात नागरिकांनी विविध तक्रारी मांडल्या. यावेळी स्थानिकांनी त्यांना मंदिरात येण्याचे निमंत्रण दिले असता अजित पवार म्हणाले, मी पहाटे पाच वाजता उठतो. एकतर मला देव-देव करायला लावा किंवा विकासकामे करायला सांगा, या वक्तव्याने नागरिकांमध्ये हशा पिकला, पण त्यातून त्यांनी विकासकामाला प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले.

## विरोधक घेणार निवडणूक आयुक्तांची भेट
# राज ठाकरे, फडणवीसांना निमंत्रण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने येत्या 14 ऑक्टोबर रोजी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेण्याचे निश्चित केले आहे. या भेटीला मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे देखील उपस्थित राहणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे.

संजय राऊत म्हणाले की, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांच्याकडे हे शिष्टमंडळ जाणार आहे. निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे आणि राज्यात सर्वच राजकीय पक्षांच्या काही समस्या आहेत, त्या मांडण्यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली आहे.

संजय राऊत म्हणाले की, सुलतानी-अस्मानी दोन संकटांशी सामना करताना मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या करत आहे. पॅकेजच्या नावाखाली कशी धुळफेक केली जात आहे. मोर्चावर टीका टिप्पणी करणं हा महाराष्ट्रातील पूरग्रस्त शेतकऱ्यांचा अपमान आहे.

आजचा हंबरडा मोर्चा जो आहे, हा शेतकऱ्यांचा आक्रोश, हंबरडा फक्त देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत नाही, तर महाराष्ट्रातील आक्रोश, हंबरडा दिल्लीपर्यंत पोहोचावा यासाठी हा मोर्चा आहे. 31 हजार कोटींचे पॅकेज देवेंद्र जी मला सांगा, हे पॅकेज फार-फार तर साडेपाच ते सहा हजार कोटींचे आहे. बाकी धुळफेक आहे, यावर मी आता बोलणार नाही.

## बिबट्याच्या हल्लात दोन शेतकरी जखमी

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ११ :

जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये बिबट्यांचा संचार आणि हल्ले वाढल्याने बिबट्यांचा बंदोबस्त करावा तरी कसा, अशी चिंता वन विभागाला सतावू लागली आहे. बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे वन कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना नागरिकांचा रोष सहन करावा लागत आहे. नाशिक जिल्ह्यात आतापर्यंत बिबट्याचे वर्षभरात आठपेक्षा अधिक बळी गेले आहेत. प्रामुख्याने नाशिक, इगतपुरी आणि सिन्नर या तीन तालुक्यांमध्ये बिबट्याचा अधिक वावर असल्याचे आणि हल्ले झाल्याचे दिसून आले आहे. देवळा तालुक्यातही बिबट्याने आता हल्ले सुरु केले आहेत. शुक्रवारी सायंकाळी बिबट्याच्या हल्ल्यात दोन जण जखमी झाले.

नाशिक तालुक्यातील वडनेर दुमाला, देवळाली कॅम्प, विहितगाव या परिसरात मागील दोन महिन्यात बिबट्याचे हल्ले अधिक झाले.आर्टिलरी सेंटरच्या वसाहत परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात दोन वर्षांच्या बालकाचा बळी गेल्यानंतर परिसरात बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाच्या वतीने पिंजरे लावण्यात आले. पंधरा दिवसांपूर्वी कुरेशी सय्यद यांच्या नातवावर बिबट्याने हल्ला करत त्याला ओढण्याचा प्रयत्न केला होता.

## कोल्हापूरचा हवालदारच निघाला बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळीचा मास्टरमाइंड



■ महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. ११ :

कोल्हापूर जिल्ह्यातील बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळीचा मोठा भांडाफोड झाला असून, यामध्ये कोल्हापूर पोलिस दलातील हवालदारच मास्टरमाईंड असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मिरज शहरातील महात्मा गांधी चौक पोलिसांनी केलेल्या या कारवाईत पाच जणांना अटक करण्यात आली , त्यांच्या ताब्यातून 1.11 कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार हवालदार इब्रार आदम इनामदार (वय 44, रा. कसबा बावडा, कोल्हापूर) असून, त्याच्यासह सुप्रीत देसाई, राहुल जाधव, नरेंद्र शिंदे आणि मुंबईतील सिद्धेश म्हात्रे यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. सर्व आरोपींना न्यायालयात हजर केल्यानंतर 13 ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही टोळी 500 आणि 200 रुपयांच्या हुबेहूब बनावट नोटा तयार करून त्या खपवण्याचे रॅकेट चालवत होती. मिरजेत व्यवहारासाठी येणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी पकडल्यानंतर संपूर्ण रॅकेटचा पदार्फाश झाला. चौकशीतून समोर आले की, या टोळीचे नेतृत्व स्वतः पोलिस हवालदार इब्रार इनामदार करत होता. त्याने कोल्हापूर येथील रुईकर कॉलनीतील ऑफिसमध्ये लॅपटॉप, स्कॅनर, प्रिंटर आणि अन्य उपकरणांच्या मदतीने बनावट नोटा तयार केल्या जात होत्या. इनामदार सध्या कोल्हापूर पोलीस दलात कार्यरत असल्याने, पोलिस विभागातही मोठी खळबळ उडाली आहे. महात्मा गांधी चौक पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सोलापूर-कोल्हापूर एक्सप्रेस वेवरील निलजी बामणी परिसरात सापळा रचण्यात आला. पोलिसांनी सुप्रीत देसाई याला अटक केली असता त्याच्याकडून 84 बनावट नोटा (500 रुपयांच्या), एकूण 42 हजार रुपये किंमतीच्या सापडल्या.

## राजकारणात नवी समीकरणं?
# भाजपाचा स्वबळाचा नारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

महाराष्ट्रातील सत्ता एकत्र, पण मनं मात्र जुळली नाहीत – हे चित्र आता स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिक ठळकपणे समोर येत आहे. एकीकडे भाजप स्वबळावर लढण्याच्या तयारीत असून दुसरीकडे शिवसेना युतीसाठी जोरदार प्रयत्न करत आहे.

मराठवाड्यातील अतिवृष्टी, महापूर आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीवर सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या ३१ हजार कोटींच्या पॅकेजच्या पार्श्वभूमीवर भाजप-शिवसेनेत नव्या राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या भाजपच्या विभागीय आढावा बैठकीत खासदार, आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी स्पष्टपणे ह्यस्वबळाचा सूर लावला. शिवसेना नकोच, अशी भूमिकाही अनेकांनी थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडली.

या भूमिकेचा परिणाम म्हणजे फडणवीसांनीही एकत्र लढण्याच्या इच्छेवर काहीसा आवर घालत, स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे संकेत दिले आहेत. याच वेळी शिवसेना मात्र युतीसाठी जास्त जागा देण्याची तयारी दाखवत भाजपला सोबत आणण्याचा प्रयत्न करत आहे. संजय शिरसाट आणि गुलाबराव पाटील यांचे सूरही युती अनिवार्य असेच आहेत. पण भाजपच्या कार्यकर्त्यांचा मूड मात्र वेगळाच. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांत भाजप संघटन मजबूत आहे, तर शिवसेनेला उद्धव ठाकरे यांच्याबद्दल असलेल्या सहानुभूतीचा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हीच गोष्ट स्थानिक नेत्यांना अस्वस्थ करणारी ठरली आहे.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि नुकसानभरपाईच्या मागणीसाठी हंबरडा मोर्चा काढत सहानुभूतीची लाट निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सरकारच्या ३१ हजार कोटींच्या पॅकेजवर फसवणुकीचा आरोप करत गावागावांत प्रचार सुरू आहे. याचा काही प्रमाणात फटका महायुतीला बसू शकतो.

आता मोठा प्रश्न असा – भाजप कार्यकर्त्यांच्या इच्छेला मान देईल की शिंदेंना सोबत घेऊन दिलेला शब्द पाळेल? पुढील काही दिवसांत या राजकीय खेळातील पत्ते उघड होतील, हे निश्चित!

# लिज्जतचे कार्य विकासाचे एकआदर्श मॉडेल आणि सर्वासाठी प्रेरणास्त्रोत

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :

'श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड या महिलांची, महिलांद्वारा महिलांसाठी कार्यरत संस्थेची ६०वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात संपव झाली.

या निमित्ताने संस्थेच्या देशभरातल्या विविध शाखा विभागांमधून आलेल्या हजारो सदस्य भगिनींना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित केलेल्या मेळाव्यामध्ये मुख्य अतिथि भारत सरकारच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय अंतर्गत कार्यरत खादी आणि ग्रामोद्योग आयोगाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री रुप राशी, विशेष अतिथि धमार्दाय सह-आयुक्त सुश्री सुवर्णा खंडेलवाल जोशी, आयोगाचे महाराष्ट्र राज्य निदेशक योगेश भामरे तसेच संस्थेचे अनेक शुभचिंतक उपस्थित होते. संस्थेच्या परंपरेनुसार मुख्य अतिथी व विशेष अतिथींच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन करुन या स्नेह संमेलनाचा शुभारंभ करण्यात आला.




या स्नेह संमेलनाच्या मुख्य अतिथि सुश्री रूप राशी यांनी लिज्जत संस्थेने केलेल्या या सन्मानाबद्दल संस्थेचे आभार मानले आणि म्हणाल्या, "लिज्जत पापह' या नावाशी मी लहानपणापासून ओडलेली आहे. जवळजवळ ६५ वर्षांपासून या 'स्वादाशी आपण सर्वच परिचित आहोत. मी यावेळी आवर्जुन सांगू इधिछते की. 'मी माज्या मार्गदर्शक गुरुंकडून हे शिकले की आपण असे काम, कार्य करावे की जे इतरांसाठी प्रेरणादायी असेल आणि ज्याने समाजाचे कल्याण सुद्धा होईल, आणि मी हे आत्मविश्वासाने सांगते की, लिज्जत ने असे कार्य करुन दाखविले आहे. लिज्जतचे कार्य हे स्वनिर्मित असून स्वतः साकारलेले आहे, त्यांनी कोणाचे अनुकरण केलेले नाही, आणि आज लिउजतने स्वबळावर बऱ्याच उद्योजकांसाठी असा उद्योग सुरु करण्याची प्रेरणा / विकासाचे एक आदर्श उदाहरण तपार करून ठेवले आहे. आपण आधुनिक उच्च शिक्षण घेतो, पण लिज्जतने इतक्या साऱ्या महिलांना एकत्रित करून फुड इंडस्ट्रीमध्ये इतकी उत्कृष्ट गुणवता सातत्याने कायम टिकवून ठेवली आहे, ज्यासाठी तुम्हा सर्व भगिनींना माझे नमन. आपण पाहतो अनेक लोक अनेक क्षेत्रात प्रयास करतात, पण लिज्जत प्रमाणे गुणवत्ता व मानकीकरण मेंटेन्ड करणे, तेही संपूर्ण भारतभरात, ही एक अशक्य गोष्ट आहे. जी लिज्जतने शक्य करून दाखविली आहे आणि भारताची क्षमता लिज्जतने सिद्ध केली आहे.

उद्योग सुरु करण्यामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या गुणवत्ता आणि घोग्य मूल्य, या दोन्ही गोष्टींचा समन्वय राखणे हे सोपे नाही आणि यातून विकासाचे एक आर्दश मडिल तयार करणे हे अधिक कठीण काम आहे. पण मला विश्वास आहे, यासर्व गोष्टी आम्ही लिज्जतकडून शिकून इतर क्षेत्रात पण उपयोगी आणू शकती. त्या पुढे म्हणाल्या, 'सहयोगातून सामर्थ्य याचा परिचय लिज्जतने दिला आहे. आज के.वी.आय.सी.चा टर्नओवर १.७०,००० करोड आहे. ज्यात लिज्जत संस्था अग्रणी आहे. आयोगाची साथ व मार्गदर्शन लिज्जत संस्थेला या पुढे ही असेच नेहमी मिळत राहिल."

यावेळी या स्नेह सम्मेलनाच्या विशेष अतिथि सुश्री सुवर्णा खंडेलवाल जोशी यांनी, ६६ वर्षांपासून कार्यरत असलेल्या, धार्मिकता व महिलांना पुढे आणणाऱ्या संस्कृतीला जोपासणाऱ्या या श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापडच्या व्यासपीठावर, संस्थेच्या हजारो सदस्य-भगिनींशी संवाद साधण्याची संधी त्यांना आज मिळाल्याबद्दल मनस्वी आभार व्यक्त केले. त्या यावेळी म्हणाल्या, "१५ ते २० वर्षांपूर्वीपर्यंतचा इतिहास पाहता महिलांना पुढे येण्यासाठी शिक्षणाच्या अभावामुळे खूप संघर्ष करावा लागत होता. पण आपल्या संस्थेमध्ये भगिनींना आत्मनिर्भर बनविण्याबरोबरच शिक्षण देण्याची व्यवस्था ही होत आहे. हे जाणून मला अत्यंत आनंद झाला. कारण जिथे काही देण्याची व काही घेण्याची मानसिकता जुळते तिथे खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण होते.

## दुचाकी आणि स्कूटीची धडक चौघे जखमी, दोन गंभीर

■ महासागर प्रतिनिधी नवी मुंबई, दि. ११ :

नवी मुंबईतील पाम बीच मार्गांवर वेगावर नियंत्रण राखता न आल्याने झालेल्या अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात सारसोळे गाव सिग्नलजवळ शनिवारी अपरात्री एकच्या सुमारास झाला आहे. या बाबत नेरुळ पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे.

शनिवारी अपरात्री एकच्या सुमारास एक दुचाकीस्वार वाशीहून बेलापूरच्या दिशेने जात असताना त्याचा वाहनावरील ताबा सुटला आणि दुचाकी थेट दुभाजकावर जाऊन आदळली. त्यामुळे तो खाली पडला. त्याचवेळी मागून येणाऱ्या स्कूटीस्वाराने त्या दुचाकीला धडक दिली, ज्यामुळे स्कूटीस्वार आणि त्याच्या मागे बसलेला व्यक्ती दोघेही गंभीर जखमी झाले.

हा अपघात वाशी ते सीबीडी मार्गीकवर घडला आहे. यात नेरुळ सेक्टर २० येथे राहणारा दुचाकी चालक विशाल संजय सूर्यवंशी, (वय २८ वर्ष , धंदा नोकरी ) याने त्याच्या ताब्यातील मो स्कुटी भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या कडेला असलेल्या पाण्याच्या लोखंडी पाईपला धडक देऊन गंभीर जखमी झाला.

# महावितरणकडून राज्यातील वीजपुरवठा सुरळीत

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :

वीज कर्मचाऱ्यांच्या २९ पैकी ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने गुरुवार (दि. ९) पासून सुरू केलेल्या ७२ तास-ांच्या बेकायदेशीर संपाच्या कालावधीत महावितरणकडून राज्यभरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात आला आहे. या संपामध्ये महावितरणमधील सुमारे ६२ टक्के अभियंते, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले नाहीत.

वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीच्या सर्व मागण्यांशी सुसंगत व सकारात्मक भूमिका महावितरणच्या व्यवस्थापनाने यापूर्वीच बैठकीमध्ये स्पष्ट केली आहे. त्याचे लेखी इतिवृत्तही संयुक्त कृती समितीला देण्यात आले आहे. तरीही दि. ९ ऑक्टोबरपासून ७२ तासांच्या बेकायदेशीर संपाला सुरवात करण्यात आली आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा आहे व नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम म्हणजेच मेस्मा लागू करण्यात आला आहे. त्यानुसार हा संप बेकायदेशीर असल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




या तीन दिवसीय संप काळासाठी महावितरणकडून आपत्कालीन पयार्यी व्यवस्था उभारण्यात आली आहे. महावितरणमध्ये गुरूवारी (दि. ९) सुमारे ६२ टक्के कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. यासोबतच २० हजार तांत्रिक बाह्यस्त्रोत कर्मचारी (यंत्रचालक व विद्युत सहायक) कार्यरत आहेत. संपकाळात प्रामुख्याने सुरळीत वीजपुरवठ्यासाठी मुंबई येथील मुख्यालयात मुख्य अभियंता यांच्या नियंत्रणात आपात्कालिन नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षाद्वारे राज्यभरातील वीजपुरवठ्यावर २४ तास लक्ष ठेवण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ व साधनसामग्रीने नियोजन करण्यात येत आहे. यासह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये देखील स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याद्वारे राज्यातील वीजपुरवठ्याची स्थिती वरिष्ठ अधिकारी व मुख्यालयास कळविण्यात येत आहे.

संपकाळातील नियोजनानुसार पयार्यी मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे. यात संपात सहभागी नसलेले महावितरणचे कर्मचारी, २० हजार बाह्य स्त्रोत तांत्रिक कर्मचारी, महावितरणच्या निवड सूचीवरील कंत्राटदार व कर्मचाऱ्यांची सुरळीत वीजपुरवठ्यासाठी स्थानिक कार्यालय, उपकेंद्र आदी ठिकाणी तात्पुरत्या नियुक्ती करण्यात आली आहे.

संपकाळामध्ये सुरळीत वीजपुरवठ्यासाठी सर्व क्षेत्रीय विभाग कार्यालयांच्या निवडसूचीवर असलेल्या सर्व कंत्राटदारांना आवश्यक साधनसामुग्री, मनुष्यबळ व वाहनांसह संबधीत कार्यालयांमध्ये उपलब्ध झाले आहेत. वीजपुरवठा संदर्भात काही तक्रारी असल्यास नागरिकांनी मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राचे १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

महासागर अमरावती
रविवार, दि. 12 सप्टेंबर 2025




अमरावती- गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 57 व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त सालाबादाप्रमाणे यंदाही मौन श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी गुरुदेव भक्तांचा असा विशाल सागर कॅमेऱ्यात टीपण्यात आला.

# ऐतिहासिक नेहरु मैदानाला हात लावाल तर खबरदार!

## आमदार दाम्पत्यांच्या निर्णयानंतर अमरावतीकर संतापले

**महासागर प्रतिनिधी अमरावती,( दि.11 ) – अंबानगरीचे हृदयस्थळ, नाट्यपरंपरेचा साक्षी असलेला टाउन हॉल आणि ब्रिटीशकालीन इमारत असलेल्या ऐतिहासीक धरोहर असलेल्या नेहरु मैदानाचे अस्तित्व मिटवून तेथे कमर्शिअल मार्केट व महापालिका कार्यालयाची इमारत निर्माण घालण्याचा घाट आमदार दाम्पत्यांकडून घालण्यात आला आहे, शुक्रवारी महापालिका कार्यालयात आयोजित बैठकीमध्ये तशी घोषणा करत प्रशासनाला प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश देण्यात आले.**



मात्र या निर्णयानंतर अमरावतीकर जनता चांगलीच संतापली आहे. इतिहासाचे साक्षीदार असलेल्या या मैदानाला हात लावात तर खबरदार, असा सज्जड दम आपल्या प्रतिक्रीयांमधून दिला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकींच्या तोंडावर हा निर्णय सत्ताधाऱ्यांच्या अंगलट येणार असल्याचे दिसत आहे.

महापालिकेचे तत्कालीन आयुक्त चंद्रकांत गुढेवार यांच्या कार्यकाळात सध्याच्या मनपा मुख्यालयाला राजकमल चौकातून स्थलांतरित करुन विद्यापीठ मार्गावरिल महापौर बंगल्याच्या ठिकाणी असलेल्या प्रशस्त जागेवर इमारत बनविण्याचा प्रस्ताव होता. या प्रस्तावाला मंजूरीही देण्यात आली होती, परंतु या दरम्यान एक मोठा काळ उलटून गेल्यावरही या प्रस्तावावर कुठलाच निर्णय झाला नाही. शहरातील वाहनांची वाढती कोंडी, पार्कींग व्यवस्था, पुलाचे निर्माणाधीन बांधकाम या पार्श्वभूमीवर हे कार्यालयाचे जुन्या प्रस्तावाप्रमाणे सर्वांच्या सोयीचे झाले असते, मात्र विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी नेहरु मैदानाला संपविण्याचा हा अचानक नविन प्रस्ताव सादर करुन या शहरातील नागरिकांना धक्का दिला असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.

### लोकप्रतिनिधींच्या हव्यासामूळे नेहरू मैदान संकटात



शहरातील अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेले नेहरू मैदान लोकप्रतिनिधींच्या हव्यासामुळे संकटात आले आहे. नेहरू मैदान हे फक्त मोकळी जागा नसून, अमरावतीच्या सामाजिक, क्रीडा आणि सांस्कृतिक जीवनाचे केंद्र आहे. इथे नेत्यांच्या सभा, महापौर चषक, विविध क्रीडा स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, दिवाळी फटाका बाजार, गणेशोत्सवातील मूर्ती विक्री केंद्र, बैलपोळा मेळा आणि नवरात्रात मोठ्या पार्किंगची सुविधा या सर्व उपक्रमांसाठी मैदानानेच पायाभूत सुविधा पुरवली आहे. अशा सार्वजनिक आणि ऐतिहासिक महत्वाच्या जागेवर प्रशासकीय इमारतीसाठी डोळा ठेवणे म्हणजे शहराच्या भावनांशी आणि जनतेच्या हिताशी संघर्ष करणे होय, असे नागरिकांचे मत आहे. हा निर्णय लोकप्रतिनिधींच्या टक्केवारीच्या हव्यासामुळे आणि प्रशासनाच्या मौन संमतीमुळे घेतला जात असल्याचा भास नागरिकांना होत आहे. यामुळेच पुन्हा एकदा नेहरू मैदान बचाव कृती समिती स्थापन करण्याची वेळ आली आहे. शहराच्या हितासाठी, भावी पिढ्यांसाठी आणि सार्वजनिक जागेच्या जतनासाठी अमरावतीतील सुज्ञ नागरिकांनी एकत्र येणे हीच काळाची गरज आहे.

**समीर जवंजाळ, युवक काँग्रेस पदाधिकारी**

### नेहरू मैदानावर एक विटही रचू देणार नाही



शहरातील ऐतिहासिक आणि सार्वजनिक महत्त्व असलेले नेहरू मैदान बिल्डरांच्या घशात घालण्यासाठी प्रशासन पुढे जात येत आहे, मात्र या मैदानावर कोणतीही नवीन वास्तू बांधण्यासाठी पक्ष एक विटही रचू देणार नाही. अमरावती शहराच्या मध्यभागी असलेले हे एकमेव मोठे मैदान, सामाजिक, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी महत्त्वाचे आहे. प्रशासन आणि राजकीय नेत्यांच्या हव्यासामुळे मैदानावर इमारती बांधण्याच्या योजना सुरू असल्याचे दिसत असून, पक्षाने या निर्णयाविरोधात स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्याचबरोबर जवळील टाऊन हॉल देखील अनेक दिवसांपासून बंद असून, तो व्यवस्थित करण्यासाठी प्रशासनाने काहीही पाऊल उचललेले नाही. हा प्रशासनाच्या आडून घेतलेला निर्णय राजकीय हस्तक्षेप आहे. शहराच्या सार्वजनिक हिताशी आणि ऐतिहासिक जागेच्या जतनाशी तडजोड होणार नाही.

**पराग गुडधे,जिल्हाप्रमुख शिवसेना ( उबाठा )**

### ऐतिहासिक वास्तू जपणे गरजेचे



अमरावती महानगरपालिकेची नवीन इमारत तयार करणे हा अतिशय चांगला उपक्रम आहे आणि शहरातील नागरिकांसाठी सोईस्कर ठरेल, पण त्यामध्ये असलेली जुनी ऐतिहासिक वास्तू धक्का न लागता जपली पाहिजे.या वास्तूचे नूतनीकरण करून आणि योग्य डेव्हलपमेंट करून ती दाखवण्याजोगी ठेवता येईल. जर अशी ऐतिहासिक वास्तू गमावली गेली, तर शहराची सौंदर्यरचना आणि वारसा नष्ट होईल आणि मुलांना ती दाखवण्याची संधीही राहणार नाही.

**संजय गव्हाळे, शिवसेना उपशहरप्रमुख.**

### तर हे शहराचे दुर्दैव!



नेहरु मैदान येथील शाळेत अनेक विद्यार्थी या शाळेतुन घडले आहे. त्याचबरोबर शहरातील हृदयस्थानी असलेले नेहरू मैदान हे एकमेव मैदान असल्याने त्या ठिकाणी प्रशासकीय इमारत व कमर्शिअल कॉम्प्लेक्स होत असेल तर ते दुर्दैव आहे. प्रशासकीय इमारत शहरातील कुठल्याही भागात निर्माण करता येईल, मात्र हे मैदान हलविता येणार नाही. या मैदानावर अनेक राजकीय सामाजिक धार्मिक कार्यक्रम झाले आहे आणि त्या नेहरू मैदान शाळेत अनेक दिग्गज मंडळांनी शिक्षण घेतलेले आहे. त्यामुळे ही जुनी वास्तू आहे, ते कायम रहावी त्याला धक्का लागू नये.

**आशिष धर्माळे, शिवसेना जिल्हाप्रमुख ( शिंदे गट )**

### हा तर मैदान गिळंकृत करण्याचा घाट



शहराचे हृदयस्थळ असलेले नेहरु मैदानाला ऐतिहासिक वारसा आहे. येथे नेताजी सुभाष चंद्र बोस येवून गेले आहे, स्वदेशीचे आंदोलन या मैदानातून सुरु झाले, शहरातील पहिली सर्कस येथेच आली, अनेक मोठमोठ्या नेत्यांच्या सभा या मैदानावर झाल्या. या मैदानाला ऐतिहासिक वारसा आहे. असे असताना कमर्शिअलच्या नावाखाली या मैदानाला बिल्डरच्या घश्यात घालण्याचा घाट घातला जात आहे. वास्तवात आम्ही हा ऐतिहासिक वारसा जपण्याच्या लायकच नाही आहो, असे दिसत आहे. नागपूरचा चिटणीस पार्कचे जतन होवू शकते तर या नेहरु मैदानाचे का नाही? या मैदानावर काही लोकांचा डोळा आहे, या मैदानाचे जतन होवून येथे लेझर, साउंड शो, संग्रहालय करता येईल, या नेहरु मैदानाला आम्ही संपवू देणार नाही.

**डॉ. अनिल बोंडे, राज्यसभा सदस्य.**

# मौन श्रद्धांजलीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती



महासागर | प्रतिनिधी



**अमरावती, ( दि. 11 )** – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवात अमरावती–गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 57 व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळातर्फे आयोजित कार्यक्रमास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आज उपस्थित होते. यावेळी गुरुकुंज मोझरी आश्रम परिसरात मान्यवरांसह भव्य जनसमुदयामार्फत स्वयंसंचलित मौन बाळगून शांततेत अत्यंत श्रद्धेय भावनेने मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सामुदायिक प्रार्थना, ध्यान तसेच आरती केली. खासदार डॉ अनिल बोंडे, बळवंत वानखडे, आमदार राजेश वानखडे, प्रताप अडसड, नवनीत राणा, प्रवीण पोटे–पाटील, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष जनार्दन बोथे गुरुजी, पुष्पा बोंडे, दिनेश सूर्यवंशी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. मौन श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम स्थळी तबला, पेटी शंखनाद या पारंपारिक वाद्यांसह सर्वधर्मीयांच्या प्रार्थना सामूहिक रित्या म्हणण्यात आल्या. डॉ. तिवारी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जीवनपट यावेळी कथन केला. मौन श्रद्धांजली कार्यक्रमासाठी देशभरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले असून देश–विदेशातील नागरिकही उपस्थित होते. पुण्यतिथी कार्यक्रम निमित्त येथे मोठी यात्रा भरलेली असून गावागावातून दिंड्या कार्यक्रम स्थळी आल्या होत्या.

## लोखंडी सळ्यांची चोरी उघडकीस

**अमरावती** – नागपुरी गेट पोलिस स्टेशनच्या डीबी टीमने अतिशय दक्षता आणि तात्काळ कारवाई करत लोखंडी सळ्यांची चोरी उघडकीस आणली आहे. या प्रकरणात पोलिसांनी रमेश चव्हाण (22, रा. राजुरा पारधी बेडा) या आरोपीला अटक करून चोरी केलेला माल जप्त केला. वालगाव रोडवरील खान ट्रेडर्सजवळील बेकरीजवळ तीन लोखंडी सळ्यांचे बंडल चोरट्यांनी चोरले होते. तक्रार मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल करून परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेजमधून आरोपीची ओळख पटवून पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला.

# तरुण व्यापाऱ्याची 3.36 कोटींची फसवणूक

### परदेशात तांदूळ पाठविण्याच्या व्यवहारात पंजाबच्या दोन व्यक्तींवर गुन्हा

**अमरावती, ( दि. 11 )** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत साईनगर परिसरात राहणाऱ्या एका तरुण व्यापाऱ्याची तब्बल 3 कोटी 36 लाख 86 हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. परदेशात तांदूळ पाठविण्याच्या व्यवसायात पंजाब येथील एफ.डी. एक्सपोर्ट कंपनीच्या मालकावर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील कृणाल रवींद्र मोरे (वय 33) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमरावतीतील राजापेठ पोलिस ठाण्यात पंजाबच्या होशियारपूर येथील करण पुरुषोत्तम गुप्ता आणि त्याच्या एका महिला सहकाऱ्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

परदेशातून मोठा ऑर्डर, आणि त्यानंतर सुरू झाली फसवणूक फिर्यादी कृणाल मोरे हे त्यांच्या भागीदार चंदनकुमार गुप्ता यांच्यासह आंतरराष्ट्रीय स्तरावर धान्य आयातङ्कनिर्यात व्यवसाय करतात. त्यांची फर्म साईनगर येथील साईबाबा विद्यालयाजवळ आहे. मार्च 2023 मध्ये त्यांच्या कंपनीला परदेशातून 3 हजार मेट्रिक टन तांदळाचा मोठा ऑर्डर मिळाला. त्यानंतर गुगलवर तांदूळ पुरवठादार शोधताना पंजाब येथील एफ.डी. एक्सपोर्ट कंपनीचा उल्लेख मिळाला. कंपनीचा मालक करण गुप्ता याच्याशी संपर्क साधून पुरवठ्याबाबत करार झाला. करारानुसार कृणाल मोरे यांनी करण गुप्ता यांच्या खात्यात आरटीजीएसद्वारे 3 एप्रिल 2023 रोजी 2 कोटी 23 लाख 86 हजार, 11 मे 2023 रोजी 45 लाख, 18 मे 2023 रोजी 45 लाख, 26 मे 2023 रोजी 23 लाख, अशा प्रकारे एकूण 3 कोटी 36 लाख 86 हजार रुपये पाठविण्यात आले. मात्र इतकी मोठी रक्कम घेऊनही आरोपीने तांदळाचा माल न पाठविता टाळाटाळ सुरू केली. सुमारे दीड वर्षानंतरही न माल मिळाला, न पैसे परत मिळाले. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने कृणाल मोरे यांनी तक्रार दाखल केली. या प्रकरणाची प्रारंभी चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात आली. तपासानंतर राजापेठ पोलिस ठाण्यात आरोपी करण गुप्ता व एका महिलेविरुद्ध भारतीय दंड संहितेतील फसवणुकीचे कलम लावून गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# एमपीहून कत्तलीसाठी आणलेले 29 गोवंश वाचवले

**अमरावती, ( दि. 11 )**– गोवंश कत्तलीसाठी अमरावतीत आणणाऱ्या टोळीवर गुन्हे शाखेने थरारक छापा टाकत 29 जनावरांची सुटका केली. नागपुरीगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत नवसारी परिसरातील लालखडी रिंगरोडलगत मन्नत पॅलेसच्या मागे ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी एमपीमधून आलेला ट्रक आणि जनावरे मिळून तब्बल ?26 लाख 45 हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

एमपी-22/एच-1353 क्रमांकाच्या 10 चाकी ट्रकमधून गोधन उतरवले जात असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानंतर पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात एपीआय अमोल कडू, मनीष वाकोडे यांचे पथक मन्नत पॅलेसच्या मागील मैदानात पोहोचले. छापा टाकताच काही आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी चित्रपटातील प्रसंगाला साजेशी झडप टाकत ट्रकचालक अहमद खान मोहम्मद खान (वय 26, रा. बोरिकला, बरघाट, शिवनी ङ्क मध्यप्रदेश) याला गजाआड केले. त्याच्या चौकशीत उघड झाले की हे सर्व गोधन इरशाद कुरेशी उर्फ 'मच्छी' (रा. पॅराडाईस कॉलनी, अमरावती) यांच्या सांगण्यावरून आणले गेले होते. मात्र मच्छी फरार झाला आहे. या प्रकरणी नागपुरीगेट पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, शाम घूगे, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. पथकात सुनील लासूरकर, दीपक सुंदरकर, फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, नाझीम, विकास गुडधे, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, प्रभात पोकळे आदींचा समावेश होता.

## गाडीतील रोकड चोरी करणारा अंतरराज्यीय टोळी अटकेत

**अचलपूर, ( दि. 11 )**– अचलपूर शहरातील स्व. छत्रपती शिवाजी कढी महाविद्यालयाच्या परिसरात दिवसाढवळ्या प्राचार्य काशीनाथ बर्हाटे यांच्या कारचे काच फोडून सुमारे 1 लाख रुपयांहून अधिक रोख चोरी करणाऱ्या अंतरराज्यीय चोरट्या टोळीला पोलिसांनी खामगाव येथून अटक केली आहे. विशालसिंह प्रमोदकुमार (वय 40, रा. अकोला) आणि बुद्धेश्वर उमाशंकर करवाल (वय 38, रा. मिर्झापूर) असे आरोपीचे नाव आहे. प्राचार्य काशीनाथ विनायक बर्हाटे यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत नमूद केले की, त्यांनी 29 सप्टेंबर रोजी दुपारी महाराष्ट्र बँकेतून रोख रक्कम काढली होती. ती रक्कम त्यांनी आपल्या पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये ठेवून कॉलेजमध्ये प्रवेश केला. काही वेळानंतर परत आल्यानंतर त्यांनी पाहिले की, गाडीच्या ड्रायव्हर साईडची काच फोडलेली आहे आणि रोकड असलेली बॅग गायब आहे.

# सकारात्मकतेचा दीप प्रज्वलित करा!

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, ( दि. 11 )**– माणूस युद्ध हरल्याने संपत नाही, तो युद्धातून पळाल्यावर संपतो. त्यामुळे मानवी आयुष्यात सकारात्मक राहणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केले. चांदूरबाजार तालुक्यातील माधान येथे आयोजित करण्यात आलेल्या दृष्टीबाधित व अल्पदृष्टी दिव्यांग बांधवांच्या भव्य संमेलनात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. जिल्ह्याच्या एकदिवसीय दौऱ्यावर असताना त्यांनी भक्तिधाम (चांदूरबाजार) नंतर माधान येथे उपस्थिती दर्शवली.

**कार्यक्रमाचे विशेष आकर्षण**

'सक्षम' या संस्थेच्या त्रैमासिकाचा दुसरा अंक यावेळी प्रकाशित करण्यात आला. दृष्टीबाधित दिव्यांग बांधवांना दृष्टीकाठी वाटप करण्यात आले. 'ज्ञानेश कन्या प्रज्ञाशोक्ष पुरस्कार ङ्क 2025' हा पुरस्कार राष्ट्रीय दृष्टी संघ, अमरावती यांना प्रदान करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा गौरव सोहळा पार पडला. हा कार्यक्रम संत गुलाबराव महाराज संस्थान माधान व सक्षम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. दिव्यांग बांधवांसाठी प्रेरणादायी ठरलेला हा कार्यक्रम मानवी मनात आत्मबल जागवणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सक्षम अध्यक्ष रामप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष सुभाष गावपांडे, महेश गणोरकर, किशोर मेटे, अनुप रघुवंशी, संत गुलाबराव महाराज माधाण चे ट्रस्टी अनिरुद्ध मोहोड, साहेबराव मोहोड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते






### संत गुलाबराव महाराजांचे विचार जीवन बदलवणारे – गडकरी

गडकरी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माझ्या आईकडून मी संत गुलाबराव महाराजांच्या ज्ञानाचे अनेक किस्से ऐकले आहेत. त्यांनी अंधत्व असूनही असामान्य ज्ञानसंपदा मिळवली. ते पुढे म्हणाले, भौतिक सुख–सुविधा असूनही माणसाचे जीवन पूर्णत्वास जात नाही. गरिबीतूनही खरा आनंद मिळतो. उत्तम संस्कार कुठेही विकत मिळत नाहीत. अध्ययन, चिंतन, ज्ञान यांच्या माध्यमातून जीवनात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. गडकरी यांनी संत गुलाबराव महाराजांच्या ज्ञानसंपदेविषयी बोलताना विज्ञानालाही त्याचे उत्तर सापडणे कठीण असल्याचे नमूद केले. ध्यान ही एक शक्ती आहे. संतांचे विचार आपले जीवन आनंदमय व सुखमय करतात, असेही ते म्हणाले. भाषणाच्या शेवटी त्यांनी, चलो जलाये दीप वहाँ जहाँ अंधेरा है असे उद्गार काढत उपस्थितांना प्रेरणा दिली.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

### दृष्टीबाधित व अल्पदृष्टी दिव्यांग बांधवांचे संमेलन

### प्रा. अरविंद देशमुख यांचे विचारमंथन

यावेळी प्रा. अरविंद देशमुख यांनी गुलाबराव महाराज यांच्या जीवनावर सखोल प्रकाश टाकला. ते म्हणाले, महाराज केवळ 9 महिन्यांचे असताना दृष्टी गेली, पण त्यांनी 14 व्या वर्षी ग्रंथलेखन सुरू केले. द्वापारयुगात गोपींनी श्रीकृष्णासाठी काट्यांचे व्रत केले, त्याचप्रमाणे कलियुगात गुलाबराव महाराजांनी काट्यांचे व्रत करत अध्यात्माची सेवा केली.



## दुचाकी चोरी

**अमरावती** = चांदुरबाजार तालुक्यातील सोनेरी येथील रहिवासी गौरव राजेंद्र गोंगे यांनी आपली दुचाकी (क्रमांक एमएच 27/एव्ही 5723) अमरावती येथील आयटीआय कॉलेजच्या भिंतीजवळ सोमवार 6 ऑक्टोबर रोजी दुपारी 3 वाजता उभी केली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्याने ती दुचाकी चोरून नेली. या प्रकरणी गौरव गोंगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# : धम्मचक्र प्रवर्तन दिन :
## १४ ऑक्टोबरलाच कां साजरा करावा?

शतकानुशतकांची गुलामगिरी, शोषण, जातिभेद यांना छेद देत नवा युगारंभ केला. हाच तो क्षण होता ज्याने दलित, शोषित, वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यामुळे १४ ऑक्टोबर हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नसून, तो आशेचा, स्वाभिमानाचा आणि क्रांतीचा दिवस आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक संदेश, धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे अन्यायाविरुद्ध बंड, पण हिंसेशिवाय. ते माणसाला माणसासमान जगण्याची शिकवण देते.

-----------------

बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा अधिष्ठान आहे ज्यात कोणतीही जात नाही, उच्च-नीचपणाचा भेद नाही. त्यामुळे धम्म स्वीकारणे म्हणजे आत्मसन्मान स्वीकारणे. १४ ऑक्टोबर १९५६ हा दिवस भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी वळण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

बाबासाहेबांनी सारनाथच्या धम्मचक्र फिरवणाऱ्या बुद्धांच्या परंपरेशी संगती साधत, आश्विन पौर्णिमेला दीक्षाभूमीवर धर्मचक्र फिरवले. त्या एका कृतीने त्यांनी पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या दास्याच्या साखळ्या तुटल्या आणि समतेच्या धमार्चा नवा प्रवास सुरू झाला.

भारताच्या दीर्घ सामाजिक इतिहासात जातिव्यवस्था ही जखम होती. शेकडो वर्षे दलित समाजाला अपमान, अन्याय, अस्पृश्यतेच्या यातना सोसाव्या लागल्या. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यास, संघर्ष आणि त्यागातून या व्यवस्थेविरुद्ध आवाज उचलला.

अखेर त्यांनी ठामपणे जाहीर केले की, मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही आणि आपल्या शब्दाला जागत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन लाखो जनतेला नवजीवन दिले. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या दिवशी बाबासाहेबांनी जे धाडस केले, त्यातून दलित समाजाने आपली गुलाम मानसिकता झटकून टाकली. हा दिवस म्हणजे स्वाभिमान दिन आहे.

काहींना प्रश्न पडतो की, हा दिवस १४ ऑक्टोबरलाच का साजरा करावा? कारण तो फक्त बाबासाहेबांचा व्यक्तिगत निर्णय नव्हता; तो संपूर्ण समाजाचा नवजीवनाचा क्षण होता. लाखो लोकांनी त्यादिवशीच आपले भविष्य बदलले. एकंदरीत हा दिवस म्हणजे धम्मक्रांतीचा जन्मदिन आहे.

हजारो वर्षे अस्पृश्यतेच्या दाहात जळणाऱ्या समाजाने पहिल्यांदा मी ही माणूस आहे असे ठामपणे जाणले, तो दिवस म्हणजे म्हणूनच १४ ऑक्टोबरला विसरून चालणार नाही. नागपूरची भूमी, लाखोंचा सागर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तेजोमय संकल्प! तो फक्त एक दिवस नव्हता; तो पिढ्यान्‌पिढ्यांच्या अश्रूंचा शेवट आणि मानवतेच्या नव्या पहाटेचा उदय होता.

या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र आलेल्या जनसमुदायाची अवस्था डोळ्यांसमोर आणली, तर अंगावर शहारे येतात. शतकानुशतकांच्या अन्यायाचे ओझे त्या दिवशी हलके झाले. आता आपणही माणूस आहोत, समान हक्काचे आहोत ही भावना आणि भावनिक दृष्टीकोन त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. ते केवळ धर्मांतर नव्हते; ती मानवी स्वातंत्र्याची घोषणा होती.

आज आपल्याला १४ ऑक्टोबरचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. कारण जातिव्यवस्था आजही वेगवेगळ्या स्वरूपात दिसते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की समता, बंधुता




आणि स्वातंत्र्य या शिवाय मानवतेला अर्थ नाही. तसेच, हा दिवस आपल्याला शिकवतो की खरी ताकद ही संघटनेत, शिक्षणात आणि विचारांत आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन केवळ स्मरणोत्सव नसून तो आहे सतत जागवणारा चेतावणीचा नगारा. विषमता, दारिद्रय, अन्याय अजूनही समाजात आहे, अशा परिस्थितीत आजच्या पिढीसाठी १४ ऑक्टोबरचा संदेश असा आहे की, समता, न्याय आणि करुणा अधिक सामर्थ्याने पसरवण्याची गरज आहे.

हा फक्त एका धर्मांतराचा दिवस नाही. तो भारतीय समाजाच्या पुनर्जन्माचा दिवस आहे. ज्यांनी अस्पृश्यतेच्या अंधःकारातून प्रकाशाकडे वाटचाल केली, त्यांचा हा उत्सव आहे. म्हणूनच आपण हा दिवस केवळ साजरा करावा असे नाही, तर जीवनपद्धतीत उतरवावा.

तो होता मनुष्यत्वाचा उत्सव, तो होता अस्मितेचा पुनर्जन्म, तो होता न्याय, समता आणि बंधुत्वाच्या नव्या वाटचालीचा आरंभ. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हते, तर मानसिक गुलामीतून मुक्त होण्याचा शपथविधी होता.

त्या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र जमलेला जनसागर पाहताना असे वाटले. जणू अंधाराने त्रस्त झालेले लाखो तारे एका सूर्याच्या प्रकाशाने उजळून निघाले. लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण ते दुःखाचे नव्हते; ते होते आनंदमुक्तीचे अश्रू. शतकानुशतके अपमान सहन केलेल्या समाजाने पहिल्यांदाच उंच मान करून मोकळा श्वास घेतला.

बुध्दधर्मात जनतेला हवा असणारा ईश्वर नाही, आत्मा नाही, चमत्कार नाहीत, त्यात दुःखावर भर आहे, ऐहिकांविषयी अनास्था आहे, ब्राम्हणी धमार्तील विषमतेची आणि अनाचारांची बाधाही त्याला झालेली आहे, शिवाय भारताबाहेर त्याचा बेसुमार जलद गतीने प्रसार झाल्यामुळे भारताबाहेरील अनेक गोष्टी बौध्दधर्म संघटनेत प्रभावी ठरल्या आहेत, इत्यादी अनेक गोष्टींचा फायदा ब्राम्हणीधर्माने पध्दतशीरपणे घेतला. अशा रीतीने एका बाजूने बौध्दाला आत्मसात करणे आणि दुसऱ्या बाजूने त्याचे उच्चाटन करणे, अशा दुहेरी-दुधारी शास्त्रानिशी बौध्दधर्माशी ब्राम्हणी नेत्यांनी सामना केला. ही खरी शोकांतीका म्हणावी लागेल.

डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्म स्वीकारला, धर्मचक्र प्रवर्तन केले पण त्यातून आजच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार पुन्हा-पुन्हा केला. तो विचार चालू ठेवायला, त्यातून आजच्या प्रश्नांची उत्तरे शोधायला ते स्वतः राहिले नाहीत, ही एक खरोखरच अत्यंत दुर्दैवी घटना समजली पाहिजे.

१४ ऑक्टोबर हा दिवस निव्वळ तारखेतला आकडा नाही. तो आहे, गुलामीतून मुक्तीचा विजयदिवस, मानवतेच्या धर्माचा पहिला जयघोष आणि आगामी पिढ्यांना दिशा देणारा दीपस्तंभ. म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन आपण १४ ऑक्टोबरलाच साजरा करतो. कारण तो दिवस म्हणजे बाबासाहेबांनी दिलेला समतेचा अमर दीप, जो कधीही विझणार नाही.

या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र येणारे लाखो अनुयायी हा केवळ उत्सव साजरा करत नाहीत; तर ते आपली माती, आपला अभिमान, आपली क्रांती पुन्हा अनुभवतात. म्हणूनच १४ ऑक्टोबरला धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करणे म्हणजे बाबासाहेबांच्या क्रांतीला अभिवादन करणे आणि आपल्या भविष्याचा मार्ग ठरवणे होय. सर्वांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मंगलमय शुभेच्छा!

■ ■ ■



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : समाज परिवर्तनाचे युगद्रष्टा



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे एक महान संत, विचारवंत, समाजसुधारक आणि भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रभावी नेतृत्व होते. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात ३० एप्रिल १९०९ रोजी जन्मलेले तुकडोजी महाराज, आपल्या अलौकिक व्यक्तिमत्वाने आणि तेजस्वी विचारांनी संपूर्ण देशावर गारुड निर्माण करणारे युगपुरुष होते.

त्यांचा संपूर्ण जीवनमार्ग हा राष्ट्रोद्धार, समाजसेवा आणि आध्यात्मिक उन्नती यासाठी समर्पित होता. त्यांनी ग्रामगीता या ग्रंथाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला जागृत केले. ग्रामगीता ही ग्रामीण विकासाचे मूलतत्त्वज्ञान सांगणारी अमूल्य ठेव आहे. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने राष्ट्र उभे राहण्यासाठी गावांची प्रगती आवश्यक आहे. त्यामुळेच त्यांनी गाव जागा, देश जागा हा संदेश जनतेला दिला.

स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी भाग घेतला. ब्रिटिश सत्तेच्या विरोधात आवाज उठवत असताना, त्यांनी संन्यस्त जीवन जगण्याऐवजी सक्रीय समाजकार्यात उतरून साधनेचा सामाजिक उपयोग कसा करता येतो, हे दाखवून दिले. त्यांची कीर्तनशैली ज्वलंत आणि प्रबोधनात्मक होती. रूढी, अंधश्रद्धा, जातिभेद यांचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला.

तुकडोजी महाराजांचा संदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे. ग्रामीण भागात शिक्षण, स्वच्छता, आत्मनिर्भरता आणि सहकार्य यावर त्यांनी नेहमी भर दिला. कर्मयोग हा त्यांच्या विचारांचा गाभा होता झ उपदेश करताना ते स्वतः झाडू हाती घेऊन काम करत, रस्ते स्वच्छ करत. त्यांचं जीवन म्हणजे विचार आणि कृती यांचा आदर्श संगम होता.

आजच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक गोंधळाच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार नवचैतन्याचा मार्ग दाखवतात. स्वार्थ, भ्रष्टाचार आणि अनैतिकतेच्या काळोखात त्यांनी दिलेला प्रकाश पुन्हा समाजाला मार्गदर्शक ठरू शकतो. त्यांचा ग्रामस्वराज्य आणि 'मानवी एकते'चा विचार आजही भारताच्या विकासात मोलाची भर घालू शकतो.

तुकडोजी महाराजांनी नुसतीच आध्यात्मिक शिकवण दिली नाही, तर ती कृतीत उतरवून दाखवली. म्हणूनच त्यांना केवळ संत नव्हे, तर राष्ट्रसंत ही उपाधी सार्थ ठरते.

■ ■ ■



**प्रमोद जांभुळकर**
**नागपूर.**
**९८२३९६९०९७**

# रेडिमेड दिवाळी!

हल्लीचा काळ झपाट्याने बदलतो आहे. कालपर्यंत संगणक, महासंगणक याला तंत्रज्ञानाच्या युगात श्रेष्ठ स्थान होते आज त्याची जागा कृत्रिम बुद्धिमत्तेने घेतली आहे. आज एआयचा वापर अनेक क्षेत्रांमध्ये होऊ लागला आहे, ज्यामुळे घंटोका काम मिनीटोमे होऊ लागले आहे.

काळागणिक मानवाच्या राहणीमानातही बदल होत गेला. वाहतुकीची विविध साधने आल्याने जुनी बैलगाडी, टमटम यांसारखी वाहतुकीची साधने कालबाह्य झाली. बाजारात जाऊन आवश्यक वस्तूंची खरेदीही आता हळूहळू कमी होत चालली आहे. गरजेच्या सर्व वस्तू आता ऑनलाईन ऑर्डर करून घरपोच मागवल्या जाऊ लागल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत माणसाच्या पोषाखांतही कमालीचा बदल झालेला दिसून येतो. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्यामुळे तर मानवाचा समाजाशीही हळूहळू संबंध तुटू लागला आहे. शहरासारख्या ठिकाणी धावपळीच्या जीवनाचा प्रभाव आता सण-उत्सव साजरे करण्यावरही होत चालला आहे.

पूर्वी दसरा सरला की दिवाळीच्या स्वागताची तयारी सुरु होत असे. अख्खे घर झाडून त्याला रंगरंगोटी केली जात असे. घरातील बच्चे कंपनीपासून वयोवृद्धही आपापल्या परीने या मोहीमेत उत्साहाने सहभागी होत असत. साफसफाई झाली कि घराघरांतून दिवाळीच्या फराळाचे सुगंध येऊ लागत. या फराळ बनवण्याच्या प्रक्रियेतही घरातील समस्त मंडळी आपापल्या परीने सहभागी होत असत.

घरातील कर्त्या पुरुषाचा बोनस झालेला असायचा, मग टेलरकडे जाऊन नवीन कपडे शिवण्यासाठी माप दिले जाई. कंदिलासाठी काठ्या गोळा करून सुरीने तासून आणि मापात कापून त्यापासून आकाशकंदील बनवला जाई किंवा माळ्यावर ठेवलेला कंदिलाचा जुना सांगाडा काढून त्याला नवीन कागद लावला जाई. घरातील महिला वर्गाची रांगोळ्यांची विशेष तयारी चालू असायची. ठिपक्यांच्या रांगोळीसाठी कागदावर मापात रेषा आखून अगरबत्तीच्या साहाय्याने त्यावर छिद्रे पाडली जात.

गेल्या वर्षीचे शिल्लक रंग आणि रांगोळी यांचा अंदाज घेऊन नवीन रंग खरेदी करण्याचा बेत आखला जात असे. ४ दिवसांत दारात कोणत्या ४ रांगोळ्या काढायच्या त्या वहीच्या पानावर पेन्सिलने काढून त्यामध्ये रंग कोणते भरायचे हेही निश्चित केले जात असे.

बच्चे कंपनी मातीचे किल्ले बनवण्याची तयारी करत. त्यासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव केली जात असे. आपण बनवलेला किल्ला इतरांपेक्षा अधिक उठून कसा दिसेल याची आगळी चढाओढ चालत असे.

नरक चतुर्दशीच्या पहाटे लवकर उठून अभ्यंग स्नान करायचे म्हणून त्याची तयारी आदल्या संध्याकाळपासूनच केली जात असे. घरातील गृहिणी घरीच उटणे बनवत असे. दिवाळीच्या गुलाबी थंडीत पहाटे लवकर उठून अंगाला सुगंधी तेल आणि उटणे लावून आंघोळ करण्यात आणि त्यानंतर अंगठ्याने नरकासुराचे प्रतीक म्हणून अंगठ्याने कारेटे फोडून त्याची कडुशार बी जिभेवर ठेवण्यात वेगळीच मौज असे.

दिवाळीच्या पहिल्या आंघोळीची सर वर्षभरात पुन्हा कधीच अनुभवाला येत नसे. सहामाही परीक्षा संपून बच्चे कंपनीला दिवाळीची सुट्टी लागलेली असायची. सुट्टी पडल्यावर सर्वप्रथम मुले शाळेत शिकवल्यानुसार शुभेच्छापत्र बनवायची आणि या शुभेच्छा पत्रांवर दिवाळीच्या शुभेच्छांसह आपुलकीचा संदेश लिहून ती पोस्टाने आपल्या आप्तेष्टांना आणि मित्र मंडळींना पाठवत. घरी बनवलेल्या फराळाच्या विविध पदार्थांची शेजाऱ्या पाजाऱ्यांकडे देवाणघेवाण व्हायची. घरोघरी जाऊन मोठ्यांचे आशीर्वाद घेतले जात असत.

आता मात्र चित्र बदलले आहे. शहरासारख्या ठिकाणी घरातील स्त्री पुरुष दोघेही नोकरी व्यवसायानिमित्त प्रतिदिन घराबाहेर पडत असल्याने दिवाळीच्या तयारीवर आणि सण साजरा करण्यावर ऑनलाईनचा आणि रेडिमेडचा प्रभाव दिसू लागला आहे. अनेक घरांत अर्बन किंवा तत्सम कंपन्यांची माणसे बोलावून घराची साफसफाई आणि रंगरंगोटी केली जाते.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

दारात रांगोळी काढण्यासाठी पुरेसा वेळ नसल्याने किंवा रांगोळी काढण्याची कला अवगत करण्यासाठी कधी प्रयत्नच न केल्यामुळे रांगोळीचे स्टिकर्स लावले जातात किंवा रांगोळीसाठी तयार छापे वापरले जातात. वाढती मागणी लक्षात घेऊन रांगोळ्यांचे विविध आकाराचे छापे आता बाजारातही मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत.

कंदीलही रेडिमेड विकत आणून दारावर लावले जाऊ लागले आहेत. मातीच्या पणत्यांची जागा आता विजेच्या तोरणांनी घेतली आहे. दैनंदिन कामाच्या दगदगीत फराळ तरी केव्हा बनवणार त्यामुळे दिवाळीसाठीचा फराळही रेडिमेड विकत आणला जाऊ लागला आहे.

लोकांची वाढती मागणी लक्षात घेऊन रेडिमेड फराळाच्या उद्योगालाही गती मिळू लागली आहे. विकत आणलेला फराळ बेताचाच असल्याने आणि तो रेडिमेड असल्याने शेजारीपाजारी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ऐन दिवाळीतही टेलर्सची दुकाने ओस पडू लागली आहेत, रेडिमेड कपड्यांचा प्रभाव वाढल्याने सराईत टेलर्सनी सुद्धा टेलरिंग सोडून रेडिमेड कपड्यांच्या अल्ट्रेशनला सुरुवात केली आहे.

भाऊ बहिणींना भाऊबीजेच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू सुद्धा त्यांना भाऊबीजेच्या आधीच मिळू लागल्या आहेत, त्यामुळे यंदा दादा ताईकडून काय भेटवस्तू मिळणार याबाबतची उत्सुकताच संपून गेली आहे. हल्ली तर किल्लेही रेडिमेड मिळू लागले आहेत.

शुभेच्छापत्र रेडीमेड मिळू लागली आहेत. आता तर शुभेच्छापत्रांचा काळही संपत चालला आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आले आहेत आणि त्यात व्हॉटस्‌अपही आहे. आता शुभेच्छांची देवाणघेवाणही व्हॉटस्‌अपवर होऊ लागली आहे. दिवाळीनिमित्त सुट्टी मिळते म्हणून इतर सुट्यांप्रमाणे दिवाळीलाही लोक उशिरा उठू लागले आहेत. त्यामुळे अभ्यंग स्नान तर बाजूलाच राहिले.

शहरातील लोकांचे राहणीमान उंचावल्याने पूर्वी ज्या प्रकारे दिवाळी श्रीमंतांच्या घरी साजरी होत असे तशी आता चाळीचाळींतूनही ती साजरी होऊ लागली आहे. कामाच्या व्यापामुळे आणि वेळेच्या अभावामुळे आताच्या पिढीला दिवाळीची सारी सिद्धता करण्यास वेळ मिळत नसेलही. मात्र रेडिमेडच्या नादात दीपावलीचा खरा आनंद आपण गमावत आहोत हे मात्र नक्की!

शहरातील धकाधकीच्या जीवनातही काही मंडळी आपली संस्कृती जोपासत आहेत, परंपरांचे पालन करत आहेत; मात्र या घरांतील कॉन्व्हेंट मध्ये, इंग्रजी माध्यमांमध्ये शिकणारी भावी पिढी ही परंपरा पुढेही चालवतील का? की करिअरच्या नादात आपल्या संस्कृतीला विसरतील हाही एक प्रश्न आहे. हिंदू धर्मियांनी आजतागायत काळानुसार आपल्या परंपरांमध्ये, चालीरीतींमध्ये बदल केलेला आहे. मात्र आपण आपल्या संस्कृतीशी जेव्हढी तडजोड करू तेव्हढे खऱ्या आनंदापासून दूर जाऊ हेही तितकेच सत्य आहे.

# सोने, चांदी तथा दागिन्यांमध्ये हॉल मार्किंग तथा कॅरेट म्हणजे नेमके काय?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**

आपण अनेक महिन्यापासून सोन्याबद्दल चर्चा करीत आहोत. आजपासून आपण हॉलमार्किंग सोन्याबद्दल नवीन माहिती जाणून घेणार आहोत, जी व्यवहारात अत्यंत उपयोगी आहे. ही माहिती नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात राहणार आहे.

**प्रश्न – हॉलमार्किंग म्हणजे काय?**

■ चमकते ते सर्व सोनेच असते, असे नाही. हॉलमार्किंगचा कायदेशीर अर्थ म्हणजे एका बनवलेल्या दागीण्यामध्ये मूल्यवान धातुचे प्रमाण काय व किती आहे. यालाच आपण सोप्या बोली भाषेत असे म्हणू शकतो की तुम्ही विकत घेत असलेले दागिने ओळखण्यासाठी हॉलमार्किंग पुढे आली. सोन्याच्या दागिन्यांची शुद्धता किती आहे? तुम्ही विकत घेत असलेल्या दागिन्यावर किती विश्वास तुम्हाला ठेवायचा आहे? याचा अंदाज दागिने घेणाऱ्याना येतो.

**प्रश्न – हॉल मार्किंग ही कल्पना कुठून आली?**

■ BIS यानी एप्रिल 2000 मध्ये भारतात आणली आणि ही जानेवारी 2008 पासून अनिवार्य करण्यात आली. सोने आणि चांदीवर हॉलमार्किंग करण्याची योजना BIS यांनी World Gold Council यांच्या कोल्याबोरेशन (सहयोग) ने ही कल्पना भारतात रुजवली गेली.

**प्रश्न – वरील प्रश्नात इक्र शब्द आला आहे, याचा नेमका अर्थ काय आहे?**




■ BIS याचा अर्थ Bureau of Standard यालाच भारतीय मानक ब्युरो असे म्हणतात. ही बॉडी सरकारी असते. याची स्थापना 23 डिसेंबर 1986 मध्ये करण्यात आली. ही बॉडी माल आणि सेवा मध्ये विविध standard (मानक) ठरवते. ही बॉडी भारत सरकारच्या Ministry of Consumer affairs, Food and Public Distribution च्या निर्देशानुसार काम करते. या बॉडीने ठरवलेल्या मानांकानुसार भारतीय ग्राहकांना माल व सेवे द्वारे प्रमाणित केले जाते, ज्या मुळे ग्राहकांच्या हिताचे रक्षण होते. ही body भारतीय माल तथा सर्विसेस दोन्हींना कवर करते या मुळे मालाला अपेक्षित मानांकन चा दर्जा मिळतो. यामुळे मालाची गुणवत्ता कायम टिकून राहते.

**प्रश्न – हॉलमार्किंग जरुरी आहे का? याचा विक्रेत्याला व ग्राहकाला काय फायदा झाला?**

■ हॉलमार्किंग हे जरुरी आहे. कारण यामुळे आपल्याला आपण घेत असलेल्या दागिन्याची शुद्धता कळते आणि आपण काय विकत घेत आहोत, हेही कळते, असे चर्चा करतांना जालना जिल्ह्यातील अंबड येथील राठी ज्वेलर्स या शोरूमचे मालक कैलास जयनारायण राठी यांनी सांगितले.

इतकेच नाही तर यामुळे ग्राहकाचा फायदाही होतो आणि यासाठी सरकारने दागिन्यांची शुद्धता कळावी म्हणून इक्र हे मानक ठरवले. त्यामुळे ग्राहकांना नेमके कळते की, आपण किती शुद्धतेचा दागिना घेत आहोत, असेही कैलाश राठी यांनी सांगितले. याचा तुम्हाला व ग्राहकाला काय फायदा झाला असे शेवटी त्यांना विचारले असता, यामुळे ग्राहकांचा विश्वास खूप वाढला असून, विक्रेता व ग्राहक दोन्हीही हॉल मार्किंगमुळे खुश आहेत. ग्राहक निर्धास्तपणे खरेदी करत आहेत, असे ते म्हणाले.

पुढील आठवड्यात आपण सोन्याविषयीची नवीन माहिती बघणार आहोत. ज्या वाचकांचे काही प्रश्न असतील त्यांनी 9422218428 या वर फक्त व्हॉटस्‌ॲप वर प्रश्न मेसेज करावे म्हणजे त्यांची उत्तरे निः शुल्क याच वृत्तपत्रात त्यांच्या नावासह दिले जातील, ही नम्र सुचना.

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## मुलांना 'नर्सिम्हा' सारखे चित्रपट अवश्य दाखवावेत!

'नर्सिम्हा' हा हिंदी चित्रपट अनेक चित्रपटगृहांमध्ये प्रस्तुत झाला. खरे तर हा चित्रपट इतका चांगला असेल अशी कल्पनाही नव्हती. कारण अलीकडे सर्वच्या सर्वच चित्रपट हे अतिशय बिभत्स, अशोभनिय, पाश्चात्य संस्कृतीने युक्त, भयावह, नशा आणि कूहष्याने युक्त असे असतात.

त्यात काही चित्रपट इतिहासावर असतील तर त्यातही रंजकता आणण्यासाठी नको असलेली अशी दृश्य किंवा कथा मिसळल्या जातात.

पण 'नर्सिम्हा' हा चित्रपट खरंच या परिस्थितीत अपवादात्मक असा आहे. त्यामध्ये खूप चांगल्या प्रकारे मुलांना आवडेल अशा पद्धतीने सर्व पात्रे साकारलेली आहेत.

भक्त प्रल्हाद आणि हिरण्यकश्यपू यांची गोष्ट साकारली आहे. केवळ पाच वर्षे वय असलेल्या भक्त प्रल्हाद याची विष्णू भक्ती किती होती? त्याच्यात किती शरणागत भाव होता? तो कसा सहनशील आणि विनम्र होता? त्याने कशा प्रकारे कठीण परिस्थितीत विष्णूभक्तीचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले? देवाने त्याला वेळोवेळी कसे तारले?, असे सर्वच खूप सुंदर आणि परिणामकारकपणे चित्रित केले आहे.

महत्त्वाचे म्हणजे त्याची भाषासुद्धा खूप सोपी आहे की जी लहान मुलांना सहज समजते. त्यामुळे लहान मुलांच्या मनावर निश्चितच भगवंताच्या भक्तीचे, नामजपाचे संस्कार होतील.

■ **सौ. आदिती देखणे**
**नवीन पनवेल, जि. रायगड.**

## जसा नेता तसे शिलेदार

राज्याच्या महायुती सरकारमधील मंत्री आणि आमदारांमध्ये काहीतरी बरळण्याची आणि वाद ओढवून घेण्याची अहमहिका लागली की काय? अशी शंका येते. वाचाळवर मंत्र्यांच्या वक्तव्यावर होणारा गदारोळ थांबत नाही तोच आणखी एखादा मंत्री, आमदार बरळतो आणि नवा वाद सुरू होतो. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी असेच एक वक्तव्य करून नवा वाद ओढवून घेतला आहे. लोकांना कर्जमाफीची सवय लागली आहे, निवडणूक काळात आश्वासने द्यावीच लागतात, लोकं म्हणतात, गावात नदी आणून द्याल का? आम्ही हो म्हणतो, लोकांनी काय मागायचे? याचा आता विचार केला पाहिजे, असे ते एका कार्यक्रमात भाषण करताना म्हणाले. तसे पाहिले तर त्यांच्या पक्षाचे प्रमुख आणि इतरही काही नेते अशी विचित्र वक्तव्य यापूर्वी करीत आले आहेत. अजित पवार तर अशा बेताल वक्तव्याने अनेकदा वादात सापडलेत. मूळ प्रश्न हा की, मंत्र्यांसारखे जबाबदार व्यक्ती अशी वादग्रस्त वक्तव्य का करतात? राज्यात कोणत्यातरी विषयावरून वाद सुरु असला की लोकांचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी अशी वक्तव्य केली जातात की काय?

खरे तर, लोकांनीच आता सुज्ञ आणि सावध होण्याची गरज आहे. अशा वाचाळवीरांभोवती आपणच गराडा घालून उभे राहतो, त्यांना अत्याधिक महत्व देतो आणि मोठे करतो. यांची दखल घेणेच बंद केले पाहिजे.

■ **जनार्दन पराते, नागपूर.**



# जास्त जंक फूड म्हणजे आजाराला निमंत्रण

बदलत्या काळानुसार खाण्यापिण्याच्या सवयी देखील बदलेल्या आहेत. कारण आजकाल प्रत्येकाला जंक फूड खाण्याचे वेड लागले आहे. तर आपल्यापैकी अनेकजण हे सकाळपासून संध्याकाळपर्यंत अनेक वेळा जंक फूडचे सेवन करत असतात.

जंक फूड चविष्ट असतात, पण त्यात आरोग्यासाठी हानिकारक अशा अनेक गोष्टी असल्याने आपल्या आरोग्यासाठी ते घातक ठरू शकतात. आरोग्य तज्ञांच्या मते जंक फूडचे जास्त सेवन केल्याने शरीरात पौष्टिकतेची कमतरता निर्माण होऊ शकते आणि यामुळे व्यक्ती अनेक गंभीर आजारांना बळी पडू शकते.

तुम्ही खात असलेल्या या जंक फूडमध्ये भरपूर कॅलरीज असतात आणि खूप कमी पोषक घटक असतात. त्यात भरपूर फॅट, साखर, मीठ आणि प्रक्रिया केलेले कार्बोहायड्रेट्स असतात, जे आपल्या शरीराला नुकसान पोहोचवू शकतात. जर तुम्ही वेळीच या पदार्थांपासून दूर राहिला नाही तर तुम्ही अनेक असाध्य आजारांना बळी पडाल.

आहारतज्ज्ञांच्या मते जंक फूडमध्ये ट्रान्स फॅट आणि सॅच्युरेटेड फॅटचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये जळजळ होते आणि रक्तवाहिन्या अरुंद होतात. यामुळे हृदयविकाराचा झटका व स्ट्रोकसारख्या आजारांचा धोका वाढतो.

निरोगी हृदयासाठी फळे, भाज्या आणि फायबरयुक्त आहार आवश्यक आहे. जंक फूडमुळे शरीरात वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढते, जे रक्तवाहिन्यामध्ये जमा होते आणि ब्लॉकेज निर्माण करते. यामुळे रक्तप्रवाहात व्यत्यय येतो आणि हृदयरोगाचा धोका वाढतो. म्हणून, जंक फूड टाळावे किंवा कमी प्रमाणात सेवन करावे.

जंक फूडमध्ये साखर आणि कॅलरीज जास्त असतात, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढू शकते. जंक फूडचे वारंवार सेवन केल्याने इन्सुलिन प्रतिसाद बिघडतो आणि टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

वजन वाढणे हे देखील या आजाराचे एक प्रमुख कारण आहे. प्रक्रिया केलेल्या आणि जंक फूडमध्ये मीठ जास्त असते, ज्यामुळे किडनीवर दबाव येतो आणि किडनीचे कार्य कमी होते. जंक फूडमध्ये कॅलरीज भरपूर असतात परंतु पोषण कमी असते, ज्यामुळे शरीरात जास्त फॅट जमा होते, ज्यामुळे लठ्ठपणा येतो. लठ्ठपणा हे हृदय, फुफ्फुसे आणि हाडांसह अनेक अवयवांवर प्रतिकूल परिणाम करते.

जंक फूडमधील साखर आणि मीठ तोंडात बॅक्टेरियांना प्रोत्साहन देते, ज्यामुळे दात खराब होऊ लागतात आणि पोकळी आणि इतर दातांच्या समस्या निर्माण होऊ शकतात. शिवाय जंक फूडचे अधिक सेवन केल्याने नैराश्य आणि ताण वाढण्यास कारणीभूत ठरतात. ■ ■ ■

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## ग्राम गीता

**ग्राम विकासाची गुरुकील्ली**
**म्हणजे तुकडोजींची ग्रामगीता**
**स्विकारता त्यातील तत्वे**
**येई आर्थिक स्वावलंबनता..**

**शेती निसर्गाचा जुगार**
**त्याला द्यावी**
**कुटीर ऊद्योगाची जोड**
**बुडत्याला काडीचा आधार**
**होते काही अंशी तडजोड ..!**

**सहकार,आचरण, चारीत्र्य**
**जागवी विश्व बंधुत्वाची भावना**
**सबका साथ सबका विकास**
**हीच यामागीलअसे प्रेरणा!**

**सिनेमा हा राष्ट्रनिर्मितीचा आत्मा आहे**

# बाजारपेठेत आणि माध्यमांमध्ये पसरणाऱ्या खोट्या कथांपासून सावध रहा : गौतम अदाणी



**मुंबई, ११ ऑक्टोबर :** अदाणी समूहाचे चेअरमन गौतम अदाणी यावेळी कोणत्याही बिझनेस इन्स्टिट्यूट किंवा समिटमध्ये नव्हते, तर ते सिनेमा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मधोमध होते. सुप्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक सुभाष घई यांनी स्थापन केलेल्या व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनल येथे अदाणी यांनी सिनेमा विभागातील विद्यार्थ्यांना संबोधित केले.त्यांनी विद्यार्थ्यांना आणि उद्योग क्षेत्रातील पाहुण्यांना सांगितले की सिनेमा हा राष्ट्रनिर्मितीचा आत्मा आहे, तसेच चेतावणी दिली की कथा मग त्या कला, माध्यम किंवा बाजारात असोत. त्या नशिब ठरविण्याची शक्ती ठेवतात.

सिनेमा या सॉफ्ट पॉवरचे महत्त्व

आपल्या मुख्य भाषणात, ज्याचे शीर्षक होते जिना यहाँ, मरना यहाँ: राष्ट्रनिर्मितीची सिनेमाई आत्मा, अदाणी म्हणाले की सिनेमा म्हणजे चालती-बोलती कविता आणि रंगांचा सुरेख संगम आहे. त्यांनी सिनेमा हे समाजाच्या सामूहिक चेतनेचे प्रतीक, संस्कृतींमध्ये पूल बांधणारे माध्यम आणि सरकारांपेक्षा जास्त काळ टिकणारी सॉफ्ट पॉवर असल्याचे सांगितले.

व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनल, मुंबई फिल्म सिटीतील २० एकराच्या कॅम्पसमध्ये, २००६ मध्ये सुभाष घई यांनी स्थापन केले. हे भारतातील प्रमुख फिल्म, संप्रेषण आणि क्रिएटिव्ह आर्ट्स संस्थांपैकी एक आहे, ज्यात फिल्ममेकिंग, अभिनय, ॲनिमेशन, फॅशन, संगीत आणि मीडिया मॅनेजमेंटचे कोर्सेस दिले जातात. या संस्थेला सतत जगातील सर्वोत्तम फिल्म स्कूल्समध्ये स्थान मिळाले आहे.

गुरुदत्त आणि राज कपूर यांना श्रद्धांजली

गुरुदत्त आणि राज कपूर यांच्या शताब्दी वर्षानिमित्त अदाणी यांनी श्रद्धांजली अर्पण करताना म्हटले की त्यांचे कार्य सिनेमा या माध्यमाच्या परिवर्तनशील शक्तीचे प्रतीक आहे.ते म्हणाले, राज कपूर यांच्या अनाडीतील गाणी ही फक्त कला नाहीत, ती तत्त्वज्ञान आहेत. त्यांनी जगाला खऱ्या भारताचे दर्शन घडवले.अदाणी यांनी सांगितले की सोव्हिएत युनियनमध्ये राज कपूर यांच्या लोकप्रियतेमुळे अशा काळात देशांमधील संबंध मजबूत झाले जेव्हा राजकीय आघाड्या कमकुवत होत्या.

स्वतःच्या जीवनप्रवासाची आठवण

भाषणादरम्यान अदाणी यांनी सिनेमा आपल्या जीवनाशी जोडत आठवण सांगितली. ते म्हणाले, मी ज्या वर्षी रिकाम्या खिशाने मुंबईत आलो, पण माझ्या डोळ्यांत स्वप्नांचे आकाश होते. ज्या वर्षी मी भारतातील सर्वात मोठे औद्योगिक घराणे उभे केले, ज्या वर्षी ते सार्वजनिक केले आणि ज्या वर्षी बंदरे व वीज क्षेत्रात प्रवेश केला.ज्या नायकांना पडद्यावर पाहिले, त्यांना मी आयुष्यात जगलो.

खोट्या कथांविषयी चेतावणी

अदाणी यांनी पुढे सांगितले की आजच्या परस्पर-जोडलेल्या जगात कथा फक्त संस्कृती नव्हे तर अर्थव्यवस्था आणि बाजारपेठांनाही आकार देतात. त्यांनी अमेरिकन शॉर्ट सेलर हिंडनबर्ग रिसर्चच्या जानेवारी मधील अहवालाचे उदाहरण दिले.ते म्हणाले, ही एक खोटी पटकथा होती जी जगभर पसरवली गेली. काही दिवसांतच अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त बाजारमूल्य नाहीसे झाले कारण तथ्य बदलले नव्हते, धारणा बदलल्या होत्या. ते पुढे म्हणाले, मौन राहिल्याने इतरांना तुमचे भविष्य लिहिण्याची संधी मिळते. सत्याला जोराने सांगितले पाहिजे. प्रचार म्हणून नाही, तर वास्तव म्हणून. अदाणी म्हणाले की हिंडनबर्ग प्रकरण ही फक्त एका कंपनीची कथा नव्हे, तर एक केस स्टडी आहे की चुकीची माहिती आणि बनावट कथा बाजार व अर्थव्यवस्था कशा अस्थिर करू शकतात.ते म्हणाले, जसे सिनेमा राष्ट्रांची कथा सांगतो, तसेच बाजारही कथांवर चालतात. प्रश्न हा आहे या कथा कोण आणि कोणत्या हेतूने लिहिते?

अदाणी यांनी पुढे सांगितले की कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) फिल्मनिर्मितीत क्रांती घडवेल.ते म्हणाले, आगामी दशकात निर्मितीचा खर्च % पर्यंत कमी होऊ शकतो. त्यांनी कल्पना मांडली की एआयच्या मदतीने एका दिवसात जागतिक रिलीज होतील, गाणी व संवाद क्षणात अनेक भाषांमध्ये तयार होतील, कथानक रिअल टाइममध्ये बदलतील, प्रत्येक प्रेक्षकाला वेगळे संस्करण दिसेल, आणि डिजिटल कलाकार पिढ्यान्‌पिढ्या जिवंत राहतील.त्यांनी एआय स्टुडिओजचीही कल्पना केली. जिथे माणूस आणि मशीन एकत्र काम करतील आणि सिनेमा स्वतः एक व्यवसाय बनून जाईल. म्हणजे पडद्यावर दिसणारी प्रत्येक गोष्ट तत्काळ खरेदीसाठी उपलब्ध असेल.

या कार्यक्रमाला उद्योगजगत, शिक्षणक्षेत्र आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक नामांकित व्यक्ती उपस्थित होत्या, ज्यात सुभाष घई, फॅकल्टी सदस्य आणि मीडिया-मनोरंजन उद्योगातील प्रमुख हस्तींचा समावेश होता. सर्वांनी एकत्रितपणे गौतम अदाणींचे उत्साहाने स्वागत केले.

# विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंग आणि विप्रो केअर्सने महाराष्ट्रातील तरुणींसाठी सन्तूर स्कॉलरशिप प्रोग्राम सुरू केला



**मुंबई, ११ ऑक्टोबर :** विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंगने विप्रो केअर्सच्या सहकार्याने यावर्षी महाराष्ट्रात आपला प्रमुख सन्तूर स्कॉलरशिप प्रोग्राम सुरू केला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या आणि अविकसित जिल्ह्यांतील तरुणींना सशक्त करण्यासाठी तयारकेलेला हा उपक्रम त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देईल, त्यांच्या क्षमतांना प्रोत्साहन देईल आणि उज्वल भविष्य घडविण्यास मदत करेल.

या वर्षी, या कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्रातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणींना शिष्यवृत्ती दिली जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संपूर्ण कालावधीसाठी शिक्षण शुल्क आणि इतर शिक्षणाशी संबंधित खर्चासाठी दरवर्षी ३०००० रुपयांची आर्थिक मदत मिळेल.

पी.एस. नारायण, विप्रो लिमिटेडचे ग्लोबल हेड - सस्टेनेबिलिटी अँड ईएसजी आणि विप्रो फाउंडेशनचे मॅनेजिंग ट्रस्टी म्हणाले, आम्ही नेहमीच मानत आलो आहोत की शिक्षण हे चांगल्या समाजासाठी मुख्य साधन आहे. या उपक्रमाद्वारे, आम्ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना उच्च शिक्षणासाठी समान संधी मिळेल यासाठी प्रयत्न करतो, जे त्यांच्या जीवनात बदल घडवून आणू शकते. महाराष्ट्रात सन्तूर स्कॉलरशिप प्रोग्राम सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे आणि अधिक समतेने आणि मानवतेने समाजासाठी शिक्षणाला पाठिंबा देण्याच्या आमच्या ध्येयासाठी प्रतिबद्ध आहोत.

नीरज खत्री, विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंग येथील कंझ्युमर केअर, इंडिया आणि सार्क बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुढे म्हणाले की, गेल्या काही वर्षांत, सन्तूर स्कॉलरशिप हा सर्वात प्रभावी शैक्षणिक उपक्रमांपैकी एक उपक्रम बनला आहे, ज्यामुळे हजारो तरुणींसाठी अनेक संधीचे दरवाजे खुले झाले आहेत. महाराष्ट्रात सन्तूर स्कॉलरशिप प्रोग्राम सुरू करून, स्थानिक पातळीवर स्पष्ट आणि मजबूत प्रभाव पाडण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल समुदायातील पात्र मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी आणि स्वतःसह त्यांच्या कुटुंबाचे चांगले भविष्य घडविण्यासाठी सशक्त करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

२०१६-१७ मध्ये सुरू झाल्यापासून, सन्तूर स्कॉलरशिपने जवळपास १०००० तरुणींच्या शैक्षणिक इच्छा पूर्ण करण्यास मदत केली आहे, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भारतातील अविकसित जिल्ह्यांतील मुलींचा समावेश आहे. हा उपक्रम अत्यंत दुर्लक्षित समुदायांपर्यंत पोहोचण्याच्या पुरावा आहे. मागील दशकात, ५० कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती वितरित करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे लाभार्थ्यांना आपले शिक्षण सुरू ठेवता आले, त्यांच्या इच्छा पूर्ण करता आल्या आणि समाजात अर्थपूर्ण योगदान देण्यास मदत झाली आहे.

हा कार्यक्रम विविध शैक्षणिक क्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. शिष्यवृत्तींपैकी ६०% शिष्यवृत्ती मानव्यशास्त्र, कला आणि विज्ञान विषयातील सामान्य पदवी अभ्यासक्रमांसाठी राखीव आहेत, तर ४०% अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्र यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राखीव आहेत. राज्यातील अविकसित जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना प्राधान्याने आर्थिक सहाय्य देखील दिले जाते.

अर्जासाठी कालावधी: १ ऑक्टोबर २०२५ ते २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत खुले आहेत. पात्रता आणि अर्ज कसा करायचा याबाबत तपशीलासाठी, http://www.santoorscholarships.com या संकेतस्थळाला भेट द्या. अर्जदार खालील हेल्पलाइनवरही संपर्क साधू शकतात: +९१ ७३३७८३५१६६ (इंग्रजी) / +९१ ७४११६५४३९३ (हिंदी).

# जीआयआयएस नागपूर विद्यार्थ्याने डीएसओ तालुका स्तरावरील थलेटिक्स स्पर्धा २०२५-२६ मध्ये पटकावले द्वितीय स्थान



**नागपूर, ११ ऑक्टोबर :** ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस) नागपूरला आठवीच्या जेम्स भोंसले या विद्यार्थ्याने डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स ऑफिसर (डीएसओ) तालुका स्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५-२६ मध्ये १४ श्रेणी अंतर्गत ४०० मीटर शर्यतीत दुसरे स्थान पटकावले आहे. नुकतीच ही स्पर्धा नागपूरमधील रवी नगर येथील युनिव्हर्सिटी ग्राउंड सिंथेटिक ट्रॅक येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेने तालुक्यातील प्रतिभावान तरुण खेळाडूंना एकत्र आणले आणि उदयोन्मुख क्रीडा प्रतिभावंतांमधील कौशल्य, सहनशक्ती आणि क्रीडा कौशल्याचे प्रदर्शक म्हणून काम केले. ही स्पर्धा जेम्सने केवळ १ मिनिट ६.५६ सेकंदात शर्यत पूर्ण करत प्रभावी कामगिरी बजावली. त्याचे समर्पण, लक्षकेंद्री वृत्ती आणि क्रीडा कौशल्याने त्याला आगामी विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेत स्थान मिळवून दिले. हा त्याच्या क्रीडा प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

आपल्या कामगिरीबद्दल बोलताना जेम्स भोंसले म्हणाला, माझ्या शाळेचे विभागीय स्तरावर प्रतिनिधित्व करताना मला खरोखर अभिमान आणि उत्साह जाणवला. हे पदक मला अधिक कठोर प्रशिक्षण घेण्यासाठी आणि सुधारणा करत राहण्यासाठी प्रेरित करते. मला कायमच पाठिंबा दिल्याबद्दल मी माझे प्रशिक्षक, शिक्षक आणि पालकांचा आभारी आहे.

जेम्सची कामगिरी खेळाप्रती त्याची चिकाटी आणि बांधिलकी प्रतिबिंबित करते. पदकाच्या पलीकडे, त्याचे यश शिस्त, दृढनिश्चय आणि लवचिकता या मूल्यांचे मूर्त स्वरूप आहे. जेम्स उत्कृष्ट कामगिरी करत राहील आणि आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या सर्व युवा खेळाडूंसाठी एक उदाहरण ठरेल असा आम्हाला विश्वास आहे, असे जीआयआयएस नागपूरच्या मुख्याध्यापिका निधी गुप्ता म्हणाल्या.

जीआयआयएस नागपूरचे क्रीडा समन्वयक प्रतीक भोयर म्हणाले, जेम्सने त्याच्या संपूर्ण प्रशिक्षणात उल्लेखनीय निष्ठा दाखवून संपूर्ण लक्ष केंद्रित केले आहे. विभागीय स्पर्धेसाठी पात्र होणे हा एक अभिमानाचा क्षण असून त्याचा प्रवास अनेक विद्यार्थ्यांना आपल्या मर्यादा पुढे नेण्यासाठी, आव्हाने स्वीकारण्यासाठी आणि सर्व प्रयत्नांमध्ये उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्यासाठी प्रेरित करेल.

जीआयआयएस नागपूर सर्वांगीण विकासासाठी वचनबद्ध आहे, विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकच नव्हे तर क्रीडा, कला आणि अभ्यासक्रमाबाह्य उपक्रमांमध्येही उत्कृष्ट कामगिरी करण्याची संधी उपलब्ध करते. निष्ठावान मार्गदर्शन, अत्याधुनिक सुविधा आणि परिपूर्ण सहाय्यक वातावरणाद्वारे, विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देण्यासाठी सक्षम करणे, त्यांना स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील आव्हानांचा सामना करण्यास तयार असलेल्या आत्मविश्वास, जबाबदार आणि कुशल व्यक्ती बनण्यास प्रोत्साहित करणे हे शाळेचे उद्दिष्ट आहे.

# 'पीएनजी ज्वेलर्स'सोबत समृद्धी, परंपरा आणि सौंदर्य जपत भरघोस सवलतींसह साजरी करूया दिवाळी

**मुंबई, ११ ऑक्टोबर :** भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह आणि मान्यताप्राप्त वारसा असलेल्या दागिन्यांच्या ब्रँड्सपैकी एक, पीएनजी ज्वेलर्स आपल्या भव्य दिवाळी मोहिमेची आनंदात सुरुवात करणार आहे. ही मोहीम सप्टेंबर पासून ऑक्टोबर पर्यंत चालणार असून, ग्राहकांना आकर्षक दरांमध्ये अप्रतिम दागिने खरेदी करण्यासाठी एक अविस्मरणीय संधी उपलब्ध करून देणार आहे.

या दिवाळी मोहिमेअंतर्गत, ग्राहकांना सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर % पर्यंत सवलत, हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर % पर्यंत सवलत, तसेच जुन्या सोन्याच्या एक्स्चेंजवर %* घट मिळणार आहे. या ऑफर्स 'पीएनजी ज्वेलर्स'च्या सर्व शोरूममध्ये तसेच ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध असणार आहेत, ज्यामुळे ग्राहकांना आपल्या सोयीनुसार उत्तम दर्जाचे दागिने खरेदी करता येणार आहे.

या मोहिमेबाबत बोलताना, 'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, दिवाळी हा प्रकाश, समृद्धी आणि एकत्र येऊन साजरा करण्याचा सण आहे. आमच्या ग्राहकांनी पिढ्यानपिढ्या पीएनजी ज्वेलर्सवर दाखवलेल्या विश्वासामुळे हा सण आमच्यासाठी विशेष आहे. या मोहिमेच्या माध्यमातून ग्राहकांना अनेक सवलतींचा लाभ घेता येईल व हा सण अधिक आनंदाने साजरा करता येईल. परंपरा, विश्वास आणि किफायतशीरपणा यांचा संगम अनुभवण्यासाठी आम्ही ग्राहकांना या मोहिमेचा लाभ देण्यासाठी उत्सुक आहोत.

दिवाळी हा भारतात दागिने खरेदीसाठी सर्वात शुभ काळ मानला जातो. या मोहिमेद्वारे, पीएनजी ज्वेलर्स विश्वास, शुद्धता आणि दागिन्यांच्या अद्वितीय कारागिरीच्या माध्यमातून आपली ओळख अधिक बळकट करत आहे. या सणासुदीत ग्राहकांना पारंपरिक कलेसह आधुनिक डिझाइन्सचा संगम असलेले सोने आणि हिऱ्याचे आकर्षक दागिने पाहायला आणि खरेदी करायला मिळणार आहेत. या मोहिमेद्वारे 'पीएनजी ज्वेलर्स' प्रत्येक सण अधिक खास बनवण्याच्या आपल्या वचनबद्धतेची जाणीव करून देत आहे. यातून परंपरेची श्रीमंती आणि आधुनिकतेची झलक एकत्र आणणारे दागिने ग्राहकांसाठी सादर केले जातील.

# कॅलिफोर्निया बदामांच्या पौष्टिकतेसह दिव्यांचा सण आनंदाने साजरा करा

**मुंबई, ११ ऑक्टोबर :** जसे दिवाळी संपूर्ण देशभर घरे उजळवते, तसेच ती एकत्र येण्याचा आनंद, जपलेल्या परंपरा आणि सणासुदीचा उत्सव घेऊन येते. मात्र, आनंदाच्या या सणासोबत अनेकदा मिठाईच्या डब्या, तळलेले पदार्थ आणि जास्त कॅलरीचे ट्रीट्स यासारखे पदार्थही येतात, जे सहज आपल्या फिटनेसच्या उद्दिष्टांना अडथळा ठरू शकतात. या दिवाळीत, प्रत्येक क्षण साजरा करताना आपल्या आरोग्याची काळजी घ्या आणि सणाच्या आनंदात तंदुरुस्तीला हृदयात ठेवा. प्रथिने, तंतू आणि हृदयासाठी आरोग्यदायी फॅट्सने निसर्गाने परिपूर्ण असलेले बदाम, दिवाळीच्या प्रत्येक टेबलसाठी संपूर्ण आणि पौष्टिक पर्याय आहेत. हे सुलभ ट्रीट म्हणून खाता येऊ शकतात, गोड पदार्थांवर शिंपडले जाऊ शकतात किंवा चवीसह आरोग्यही देणारे विचारपूर्वक भेटवस्तू म्हणून सादर केले जाऊ शकतात.

नट्सचा राजा म्हणून ओळखले जाणारे बदाम, १५ आवश्यक पोषक घटकांनी समृद्ध आहेत, ज्यात प्रथिने, कॅल्शियम, झिंक, आहारतंतू, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन ई यांचा समावेश होतो. त्यांचे अनेक फायदे आहेत, जसे की रक्तातील साखर नियंत्रण, स्नायूंची सुधारणा, हृदयाचे आरोग्य आणि वजन नियंत्रण. पौष्टिक आणि बहुपयोगी असलेल्या बदामामुळे दिवाळीचा आनंद आरोग्याच्या तडजोडीशिवाय घेता येतो.

बॉलिवूड अभिनेत्री सोहा अली खान सण-उत्सवांमध्ये जागरूकतेने आणि आरोग्यदायी सवयींसह समतोल राखण्याविषयी सांगतात, दिवाळी हा कुटुंबीय आणि मित्रांसह एकत्र येण्याचा, आनंद साजरा करण्याचा काळ आहे. एक आई म्हणून मला इनायालाही सर्व सणसुदीचा आनंद घ्यावा, पण त्याचवेळी आरोग्यदायी आहाराच्या सवयी आत्मसात कराव्यात असे वाटते. आम्ही जे पदार्थ खातो त्याबद्दल तिची जाणीव वाढवण्यासाठी मी तिला स्वयंपाकात आणि शिकण्यात सहभागी करून घेते. या दिवाळीत आपल्या प्रियजनांसह आरोग्य व आनंदाचा प्रकाश साजरा करूया एक आरोग्यदायी घास प्रत्येक वेळी.




आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. मधुमीथा कृष्णाने पुढीलप्रमाणे सांगतात, पारंपरिक आरोग्याच्या दृष्टीने बदामाचे महत्त्व अधोरेखित करत: आयुर्वेदानुसार, आहार किंवा 'आहार' हा उत्तम आरोग्याचा पाया आहे. बदाम अनेक काळापासून त्याच्या फायद्यांसाठी ओळखले गेले आहेत, दोष संतुलित करतात आणि जीवनशक्तीला चालना देतात. जड मिठाई, जी कफ वाढवते आणि सुस्ती निर्माण करते, त्याउलट बदाम शरीराला तृप्त करतात आणि हानीकारक नाहीत. प्राचीन आयुर्वेद, सिद्ध आणि युनानी ग्रंथांमध्येही त्वचेच्या आरोग्यासाठी बदाम उपयुक्त असल्याचे नमूद केले आहे. या दिवाळीत, पारंपरिक पदार्थांमध्ये किंवा उदार भेटवस्तू म्हणून बदामांचा समावेश करणे, हा साधा पण प्रभावी मार्ग आहे ज्यामुळे आपण सणाचा आनंद साजरा करताना संपूर्ण आरोग्याचे तत्वज्ञान पाळू शकतो.

सणासुदीच्या काळात पोषणाचा समतोल राखण्याविषयी बोलताना, मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख पोषणतज्ज्ञ ऋतिका समद्दार म्हणाल्या, दिवाळीच्या काळात बहुतेक वेळा उच्च-कॅलरी आणि साखरयुक्त पदार्थांचा अतिरेक दिसतो, ज्याचा आपल्या आरोग्याच्या उद्दिष्टांवर परिणाम होऊ शकतो. परंतु हे सर्व किंवा काहीच नाही असे नसते. महत्त्वाचे म्हणजे अशा बुद्धिमान बदल आणि भर घालणे, ज्यामुळे स्वाद कमी न करता पोषणमूल्य वाढते.

पोषण आणि वेलनेस सल्लागार शीला कृष्णस्वामी यांनी सणासुदीतील सजगतेबद्दल सांगितले, एक पोषणतज्ज्ञ म्हणून मी नेहमी सांगते की दिवाळी ही केवळ उत्सवाची वेळ नाही, तर आरोग्यदायी निर्णय घेण्याचीही संधी आहे. साखरयुक्त आणि तळलेले पदार्थ रक्तातील साखर वाढवतात आणि वजनावर परिणाम करतात, त्यामुळे त्याऐवजी पौष्टिक पर्याय निवडणे आवश्यक आहे. प्रथिने, तंतू, जीवनसत्त्व ई, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस यांनी युक्त बदाम हे चवीत कोणतीही तडजोड न करता सणासुदीच्या पदार्थांना आरोग्यदायी स्पर्श देतात.

या वर्षी, प्रकाशाचा ऋतू अशा क्षणांसह साजरा करा जे आनंददायी आणि पौष्टिक असतील. तुमच्या उत्सवाच्या कार्यक्रमात कॅलिफोर्निया बदाम जोडल्याने, प्रत्येक मेळावा निरोगी आणि आनंददायी असेल.

# शब्दकोडे क्रमांक २२३७



**आडवे शब्द :-**


१) राष्ट्रपित्याचे संपूर्ण नाव
११) डोंगराचा तुटलेला भाग
१२) बाम, जखमेवर लावण्याचा स्निग्ध औषधी प्रकार
१३) पाझर
१४) नवरदेवास घालण्याचा हार
१६) गाणे
१८) गव्हाचे पीठ
२०) भविष्यकथनाचा एक प्रकार
२२) लक्ष्मीचे एक नाव
२३) व्यापारी फायदा
२५) चावी
२६) शाब्दिक चकमक
२८) कडक
२९) खात्री
३१) फुलांची लहान टोपली
३३) अस्थिर मनाचा
३५) वाकण्याची क्रिया
३७) वेतन
३९) पथ, सडक
४१) पंख
४२) दाढीवाला, उग्र वासाचा प्राणी
४५) धाक, दरारा
४७) वर्ष
४८) संपूर्ण
४९) शीतल
५०) पेट्रोलशिवाय चालणारे दुचाकी वाहन
५२) सरपटत जाणे
५४) सगळे
५५) वीज (हिं)
५६) टिंगल
५७) चंद्राची कड
५८) प्रामाणिक
५९) आवरण
६१) वल्लरी
६३) खाऊन संपविणे
६४) मत देणारा
६६) सोज्वळ
६८) भयंकर
७०) संध्याकाळ
७१) च्या बरोबर
७२) बशीचा जोडीदार
७४) आकाशस्थ गोल
७५) टीच, ताणलेल्या पंजाचे माप
७७) आयातकर
७८) संसदसदस्य
७९) भटक्या, गोसावी
८०) एकूणएक, सर्व
८१) उपवन

**उभे शब्द :-**

१) गणेशाला आवडणारा एक पदार्थ
२) शंकर
३) पायाचा उभा मांसल भाग
४) सारखा
५) कल्ला, आवाजांचा गोंधळ
६) सुंदर तरुणी
७) सोम, रजनीनाथ
८) एक सुगंधी वनस्पती
९) मासे पकडणारा कोळी (सं.)
१०) जास्तीतजास्त व कमीतकमी
१५) दारूचा एक प्रकार
१७) नशीब, दैव (हिं.)
१९) सोनचाफा
२१) चिरताना रडविणारा कंद
२४) सापाने सोडलेली त्वचा
२६) वितरण
२७) उपयोग
२९) त्वचा, चामडे
३०) रक्षण करणारा
३२) अंकुर
३४) खंदक
३६) टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास
३८) डोक्यावर पांढरे फूल असलेले गवत
४०) स्तुती करणारा
४२) बोलणारा सिनेमा
४३) साप, डासाचे चावणे डंख मारणे
४४) विपुल आढळणारा जलचर
४६) मनाची अस्थिरता
४७) तात्पर्य
५१) एक शब्दालंकार
५२) खेळकर, सोपे
५३) फळाचे साल
५८) सामन्यातील पराक्रमी
६०) वस्ती
६२) तक्र
६५) शराब, मद्य
६७) पाढ्यातील सहा
६९) मनाचे श्लोक लिहिणार संत
७०) ऐकीव पुराव्याशिवाय ऐकलेली बातमी
७१) मनात काही हेतू धरून केलेले कार्य
७३) गवंड्याकडील पाणी वाहून नेण्याचे साधन
७६) अंधार
७७) वृद्धत्व, थोडे

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# सकरा वर्ल्ड हॉस्पिटल कर्नाटकचे पहिले रुग्णालय बनले ज्याला मिळाली एएसीआयची मान्यता

**बेंगळुरू, ११ ऑक्टोबर :** भारतातील पहिले १००% एफडीआय-फंडेड टर्शियरी केअर हॉस्पिटल, सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, कर्नाटकचे पहिले रुग्णालय बनले आहे ज्याला अमेरिकन ॲक्रेडिटेशन कमिशन इंटरनॅशनल (एएसीआय) कडून मान्यता प्राप्त झाली आहे. ही प्रतिष्ठित मान्यता सकराच्या नैदानिक उत्कृष्टतेची, रुग्ण सुरक्षेची आणि जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा पद्धतींच्या कटिबद्धतेची पुनःस्थापना करते.



इंटरनॅशनल सोसायटी फॉर क्वालिटी इन हेल्थ केअर एक्सटर्नल इव्हॅल्युएशन असोसिएशन (आयइइए) कडून मान्यता प्राप्त एएसीआय हे सुनिश्चित करते की त्याचे मानक हे सर्वोच्च जागतिक निकषांनुसार असावेत आणि आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींनुसार सतत विकसित होत राहावेत. एएसीआय मान्यता मिळवलेल्या रुग्णालयांना आरोग्यसेवा, सुरक्षा आणि संचालनाच्या प्रत्येक पैलूत कठोर मूल्यांकनातून जावे लागते.

सकरा वर्ल्ड हॉस्पिटलचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. युइची नागानो म्हणाले, एएसीआय मान्यता मिळवणे ही केवळ एक ओळख नाही. हे सकराची स्थिती अधिक दृढ करण्यासोबतच कर्नाटक आणि भारतातील आरोग्यसेवा वितरणाची पातळी उंचावते. हे रुग्ण सुरक्षेसाठी आणि गुणवत्तेसाठी नवे मानक प्रस्थापित करते आणि भारताची जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा व वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून प्रतिष्ठा आणखी दृढ करते. यामुळे रुग्ण, विमा कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय भागीदारांमध्ये अधिक विश्वास निर्माण होतो. आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त पद्धती अवलंबून सकरा केवळ स्वतःचे ध्येय पुढे नेत नाही तर संपूर्ण आरोग्यसेवा व्यवस्थेलाही उंचावत आहे.

## राशीभविष्य

**मेष :** तुम्हाला ऑफिसमध्ये काही कामाची चर्चा करावी लागू शकते आणि तुमचे शत्रू तुमच्या योजनांनी अधिक प्रभावित होऊ शकतात. आजचा दिवस खास आहे. तुमच्या आयुष्यातील सर्व समस्या लवकरच दूर होतील.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असेल. तुम्हाला तुमच्या कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल आणि भविष्यात कोणत्याही समस्यांना तोंड द्यावे लागू नये म्हणून पैसेही वाचवाल.

**मिथुन :** तुमचा दिवस चांगल्या मूडमध्ये सुरू होणार आहे. तुमच्या पालकांचा काही काळापासून असलेला राग आज संपेल. राजकारण आणि सामाजिक कार्यात सहभागी असलेल्यांना दिवस अनुकूल वाटेल.

**कर्क :** या राशीच्या गृहिणी ज्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे त्यांच्यासाठी चांगल्या संधी निर्माण होतील. तुमचा उत्साहही वाढेल. तुमच्या भावंडांकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.

**सिंह :** आज तुमच्यावर काही कौटुंबिक जबाबदाजया देखील सोपवल्या जातील, ज्या तुम्ही पूर्ण कराल. तुमचे पैसे कुठे खर्च होत आहेत यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. अनावश्यक गोष्टींचा ताण घेऊ नका.

**कन्या :** तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी तुम्हाला नवीन संधी मिळतील. आज तुम्ही एखाद्याला उधार दिलेले पैसे अचानक परत मिळू शकतात. तुम्हाला व्यवसायात फायदा होण्याची शक्यता वाढेल.

**तुळ :** काही समस्या उद्भवू शकतात. तुमची सार्वजनिक प्रतिमा तुमच्यासाठी अनुकूल असेल. जर तुम्ही व्यवसाय चालवत असाल तर तुम्हाला तो वाढवण्यासाठी थोडे अधिक परिश्रम करावे लागतील.

**वृश्चिक :** सामाजिक कार्यात तुमची आवड वाढू शकते. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल. व्यवसाय भागीदारीमुळे तुम्हाला फायदा होऊ शकतो. कुटुंबातील सदस्यांशी संबंध सुधारतील.

**धनु :** आर्थिक बाबींमध्ये लोकांवर जास्त विश्वास ठेवणे टाळावे. कोणालाही पैसे उधार देण्यापूर्वी विचारपूर्वक विचार करणे शहाणपणाचे ठरेल. बडबड करण्यापेक्षा कामावर जास्त लक्ष केंद्रित केले पाहिजे.

**मकर :** आज तुम्हाला सामाजिक कार्यात रस राहील. लोकांच्या टीकेकडे लक्ष देऊ नका,मन विचलित होऊ देऊ नका. आज तुम्ही जमीन किंवा घर खरेदी करण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** तुम्ही तुमच्या व्यवसायात एक नवीन उपक्रम सुरू करू शकता, जिथे तुम्ही वेळोवेळी बदल कराल. या काळात, तुम्ही तुमच्या घरासाठी एक आलिशान वस्तू खरेदी करू शकता. आर्थिक परिस्थिती चांगली असेल.

**मीन :** कामाच्या ठिकाणी तुम्हाला अपेक्षित फायदे मिळतील. स्थलांतराची शक्यता आहे. तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील. सगळं तुमच्या मनासारखं होईल. तुमच्या कुटुंबातील वातावरण शांततापूर्ण असेल.

# अतिवृष्टीने पिक, परिश्रम, स्वप्नं अन् लेकरांची दिवाळीही बुडविली

## मेळघाटात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि.11)** – मेळघाट परिसरात झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतात उभे असलेले सोयाबीन आणि मक्का पिके पूर्णपणे पाण्याखाली गेली असून अनेक ठिकाणी माती वाहून गेल्याने शेतांची सुपीकता कमी झाली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून पिकांच्या भरघोस उत्पन्नाची आशा ठेवून शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली होती. मात्र या पावसाने त्यांची सर्व मेहनत आणि स्वप्नं वाहून नेली. काहींच्या पिकांना कुज लागली, तर काहींची शेतेच पाण्याने वाहून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये हतबलता आणि निराशा पसरली आहे.

अनेक कुटुंबांची दिवाळी आता अंधारात गेली आहे. लेकरांसाठी नवे कपडे, मिष्ठान्न आणि दिवाळीचा आनंद घेण्याचं स्वप्न आता पाण्यात विरलं आहे. काहींना मुलांची शाळेची फी भरणे अवघड झाले आहे, तर काहींनी घेतलेली कर्जे फेडणेही अशक्य झाले आहे. या भागात शेकडो एकर शेतीचे नुकसान झाले असून प्रशासनाकडून पंचनामे सुरू आहेत. मात्र, शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की फक्त पंचनामे करून उपयोग नाही, तर तात्काळ आर्थिक मदत हवी. पिक गेलं ते गेलं, पण लेकरांचं अन्न आणि शिक्षण कसं चालवायचं? असा हताश प्रश्न आता प्रत्येक शेतकऱ्याच्या ओठांवर आहे. अतिवृष्टीच्या या संकटाने पुन्हा एकदा बळीराजाची दिवाळी अंधारात ढकलली आहे.



मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यात सततच्या होणाऱ्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे असलेले शेतातील सोयाबीन मक्का तुर इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. बाजारात सोयाबीनला मिळणारा अत्यल्प भाव यामुळे शेतकऱ्यांची परिस्थितीत गंभीर झालेली आहे. तरी शासनाने यावर उपाययोजना म्हणून प्रति हेक्टरी 50 हजार रुपये व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी.

**नरेंद्र टाले**
**प्रहार कार्यकर्ता चुरणी.**

# आत्मनिर्भर भारताचा संकल्प तळागळापर्यंत नेऊ - खा. डॉ. अनिल बोंडे

## सांसद स्वदेशी मेळाव्यात जिल्हा व बाहेरील 70 हून अधिक बचत गटांचा सहभाग

महासागर | प्रतिनिधी

**वरुड,(दि.11)** – भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देश व राज्य प्रगतीच्या वाटेवर आहेत. त्यांच्या प्रेरणेतून आत्मनिर्भर भारताचा संकल्प तळागाळापर्यंत पोहोचवू. स्थानिक उद्योग, स्वदेशी उत्पादने आणि महिला बचत गट हे या अभियानाचे मूळ आधारस्तंभ आहेत.

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संत्रा लिलाव मंडी येथे 10 ऑक्टोबर रोजी सांसद स्वदेशी मेळावा या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला मूर्त रूप देण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख होते. या प्रसंगी कॅट चे विदर्भ प्रांताध्यक्ष विनोद कलंत्री, मोर्शी विधानसभा प्रभारी शंतनु देशमुख, माजी जि.प. अध्यक्ष ज्ञानेश्वर दाभाडे, उल्हास लेकुरवाळे, तहसीलदार राम शेळके, प्रभारी गटविकास अधिकारी पिल्लारे, तालुका कृषी अधिकारी तसेच अमित कुबडे, गोपाल पांडे, राजेश गांधी, गिरीधर देशमुख, रूपाली सोंडे, शशिभूषण उमेकर, गोपालगिरी महाराजसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या स्वदेशी मेळाव्यात जिल्ह्यातील तसेच बाहेरील 70 हून अधिक महिला बचत गटांनी सहभाग घेतला. विविध उन्हाळी वाळवट, नैसर्गिक उत्पादने, हस्तकला, कृषी आधारित व पर्यावरणपूरक वस्तू, स्वदेशी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, कापड, साडी प्रदर्शनी, सजावट साहित्य, दैनंदिन उपयोगी खाद्यपदार्थ तसेच उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अशा अनेक आकर्षक स्टॉल्सनी प्रदर्शन रंगतदार बनवले. तिन्ही दिवस चालणाऱ्या या मेळाव्यात सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम, महिलांसाठी कौशल्य विकास मार्गदर्शन, तसेच 'वोकल फॉर लोकल' या संकल्पनेवर जनजागृती करण्यात येणार आहे.



### स्वदेशीचा मंत्र नवीन भारताची निर्मिती करतोय - विक्रम ठाकरे

महिला आर्थिक स्वावलंबन, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन आणि समाजात 'स्वदेशीचा मंत्र' रुजवणे हे या मेळाव्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. स्वदेशीचा विचार नवीन भारताची निर्मिती करत असल्याचे मेळाव्याचे प्रकल्प संयोजक व माजी सभापती विक्रम ठाकरे यांनी सांगितले.

# अमरावतीत ग्राम रोजगार सहाय्यकांचे आमरण उपोषण सुरू!

**मागणी मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे नाही | खा. श्रीकांत शिंदे यांची फोनवरून उपोषणकर्त्यांशी चर्चा**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,(दि.11)**– येथे जिल्हाभरातील ग्राम रोजगार सहाय्यकांचे आमरण उपोषण सुरू असून हे आंदोलन अनेक दिवसांपासून चालू आहे. शासनाकडून वारंवार आश्वासने मिळूनही प्रत्यक्षात मागण्यांवर तोडगा निघत नसल्याने रोजगार सहाय्यकांनी अखेर आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे.

या आंदोलनात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शेकडो रोजगार सहाय्यक उपस्थित असून त्यांनी एकत्रितपणे मागण्या मंजूर झाल्याशिवाय उपोषण थांबवणार नाही असा निर्धार व्यक्त केला आहे. सेवेत स्थैर्य, वेतनवाढ, नियमितीकरण आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या तोडीचे हक्क देण्यात यावेत, अशा आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. शासनाने यापूर्वी अनेकदा तोंडी आश्वासने दिली असली तरी ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संताप आहे. दरम्यान, खासदार श्रीकांत शिंदे यांनी उपोषणकर्त्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आणि शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. मात्र, रोजगार सहाय्यकांनी स्पष्ट केले की शासनाने लेखी आदेश काढल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही.



उपोषणस्थळी जिल्ह्यातील अनेक सामाजिक संघटना व राजकीय कार्यकर्ते भेट देत असून त्यांनी आंदोलनास एकमुखी पाठिंबा दर्शविला आहे. काही उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती मिळाली असून त्यांना वैद्यकीय उपचार देण्यात आले आहेत. प्रशासन व पोलिस यंत्रणा सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. रोजगार सहाय्यकांचे हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात असून आता शासनाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## युवकावर मारहाण

**अमरावती** – संजय गांधी नगर क्रमांक 2 येथील रहिवासी रंधीर पंडितराव कापसेकर हे रविवारी दुचाकीवरून कामावर जात असताना यशोदा नगर चौकात आरोपी सागर कोरे याने दारू पिण्यासाठी पैसे मागितले. रंधीर यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने सागर कोरे याने त्यांच्याशी शिवीगाळ करून मारहाण केली.

# 'उर्ध्व वर्धा'तून रब्बी हंगामासाठी पाच पाणीपाळ्या

## शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,(दि. 11)**– उर्ध्व वर्धा प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी पाणीसाठा उपलब्ध असून, पाच पाणीपाळ्या देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. यासाठी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी 10 नोव्हेंबर 2025 पर्यंत संबंधित शाखा कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे.

उजवा मुख्य कालव्याच्या आरंभापासून 14.34 किमी आणि डावा मुख्य कालव्याच्या 22.44 किमी पर्यंतच्या लाभक्षेत्रातील सर्व वितरिका, जलाशय आणि अधिसूचित नदीनाल्यांवरील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पाणी पुरवठा केला जाईल. पाणी वितरण 'टेल टू हेड' तत्त्वानुसार, म्हणजे कालव्याच्या टेल भागापासून मुखाकडे जाऊन होईल. नोव्हेंबर ते मार्च दरम्यान पाच वेळा पाणी मिळेल. शेतकऱ्यांनी थकबाकीची एक तृतीयांश रक्कम व चालू हंगामाची अग्रिम पाणीपट्टी भरली पाहिजे. उपसा सिंचन लाभधारकांनी नळमार्गावर पाणी मोजमाप यंत्र बसवावे आणि मंजूर क्षेत्रातील पिकांना पाणी वापरावे. मंजूरीपेक्षा जास्त क्षेत्र भिजवल्यास दंडनीय कारवाई होईल. तसेच, कालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी शेतचारी स्वच्छता राखणे आवश्यक आहे. एकूण 94 दिवस पाणी सोडण्यात येईल. शेतकऱ्यांनी टेल टू हेड सिंचन पद्धतीने रात्रंदिवस पाणी घेऊन पिकांना अधिकाधिक फायदा मिळवावा.

## बॅटरी चोरी करताना दोन अटक

**अमरावती** – नांदुरा येथील शेतात उभ्या असलेल्या ट्रॅक्टरची बॅटरी चोरी करणाऱ्या यश आणि आकाश मेश्राम या दोघांना ग्रामस्थांनी रविवारी दुपारी 3 वाजता रंगेहात पकडले. त्यानंतर दोघांनाही वलगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी अखिलेश जयस्वाल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी यश आणि आकाश मेश्राम यांच्या विरोधात गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास पोलिस करीत आहे.

# मुदत संपलेल्या खाद्यपदार्थांची सर्रास विक्री



महासागर | नितीन दुर्बुडे

**पथ्रोट,(दि.11)** –शहरासह ग्रामीण भागात मुदत संपलेल्या खाद्यपदार्थांची सर्रास विक्री होत असल्याचा प्रकार उघड झाला असून, यात प्रामुख्याने टोस्ट, खारी, बिस्किटे आणि इतर पॅकेज्ड वस्तूंचा समावेश आहे. या गंभीर प्रकारामुळे लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचेच आरोग्य धोक्यात आले आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन विभागाने दरवर्षी प्रमाणे नावापुरती संबंधित दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

शहरासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये सकाळच्या वेळेस काही दुकानदार दुचाकीवर विविध खाद्यपदार्थ घेऊन गल्लीबोळात विक्रीसाठी फिरत असतात. मात्र या वस्तूंपैकी काहींची मुदत संपलेली असते. नागरिकांनी मुदत विचारल्यास 'तुम्हाला खायचे असेल तर घ्या, नसता विचारू नका,' असे उत्तर मिळते, अशी तक्रार नागरिकांकडून होत आहे. काही मोठ्या शहरांतून मुदतबाह्य खाद्यपदार्थ या भागात आणले जात असून, ते स्वस्तात विकले जात आहेत. त्यामुळे स्थानिक बाजारात अशा वस्तूंची विक्री वाढली आहे.

### मुदत तपासून खाद्यपदार्थ घ्या!

खाद्यपदार्थ विकत घेताना नागरिकांनी त्यावरील मुदत तपासूनच खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मुदत संपलेले पदार्थ देऊन ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाईसह फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सहायक आयुक्तांनी दिली. नागरिकांनी अशा प्रकारांची माहिती तत्काळ प्रशासनाला कळवावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### कर्मचारी संख्येचा अभाव

या सर्व प्रकारात अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विभागात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने शहर आणि ग्रामीण भागातील तपासणी अपुरी पडते. परिणामी मुदतबाह्य खाद्यपदार्थांची विक्री बिनधास्त सुरू आहे. हा प्रकार वेळीच थांबवला नाही, तर गंभीर आरोग्य संकट निर्माण होऊ शकते, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे.

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### अन्न व औषध प्रशासनाची नावापुरती कारवाई

### ग्राहकांची दिशाभूल

आकर्षक पॅकेजिंग आणि उच्च दर्जाची हमी या नावाखाली ग्राहकांची दिशाभूल होत आहे. चमकदार पॅकिंगमुळे ग्राहक वस्तूचा दर्जा तपासण्याऐवजी ती थेट विकत घेत आहेत. यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत असून, रुग्णसंख्या वाढण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# निवडणूकांच्या पार्श्वभूमिवर शुभेच्छांची बजबजपुरी

## जनता म्हणतात काम दाखवा, मत घ्या!




महासागर | प्रतिनिधी

**वरुड,(दि.9)** – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत आपली हवा बनविण्याकरिता गाव पुढाऱ्यांची धडपड सुरु आहे. विविध सणांच्या पार्श्वभूमीवर कधी नव्हे तर आता गाव पुढारी समाज माध्यमांवर पोस्ट तयार करुन शुभेच्छांचा पाऊस पाडत आहे. निवडणूका आल्या की, तोच तो प्रकार पाहून कंटाळलेली जनता आता कामगिरी दाखवा आणि मत घ्या असे संकेत गाव पुढाऱ्यांना देत आहे.

नुकताच दसऱ्याच्या निमित्ताने फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्रामवर शुभेच्छांची अतिवृष्टी पहायली मिळाली. दुसरीकडे शहराच्या कानाकोपऱ्यात बॅनर, फ्लेक्स मोठ्या प्रमाणावर झळकले. या चढाओढीमूळे निवडणुकांचा माहोल अधिकच रंगतदार झाला आहे. गावागावात मतदारांत वेगळीच चर्चा रंगू लागली आहे. फक्त शुभेच्छा देऊन काही होत नाही, कामगिरी दाखवा, अशा शब्दांत मतदार नेत्यांना ओळखून मतदान करणार असल्याचे स्पष्टपणे सांगताना दिसत आहेत. निवडणुकीपूर्वी सणांच्या माध्यमातून मतदारांवर छाप पाडण्याचा नेत्यांचा प्रयत्न सुरू असला तरी यावेळी मतदार शुभेच्छांच्या गोड बोलांना न भुलता ठोस विकासकामे, लोकहिताचे निर्णय व नेत्यांची खरी कार्यक्षमता यांचा विचार करूनच मतदान करणार असल्याची चर्चा जोर धरत आहे.

# लाहोटी महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा गौरव दिन

## निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन



महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 11)**– श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री. आर.आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एन. चौधरी यांच्या मार्गदर्शनात सदर निबंध व वक्तृत्व स्पर्धा महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा.विलास अंबाडकर हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.विनोद सावरकर,प्रा.हर्षल देशमुख, प्रा. मंगेश माकोडे हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिपाली चिखले यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सरिता अविनाशे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. माधुरी खडसे यांनी केले.या वक्तृत्व स्पर्धेमध्ये वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आणि मराठी भाषेचे महत्त्व, मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा यावर भाष्य केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. विलास अंबाडकर यांनी भाषेचा विकास झाला पण आजच्या मोबाईलच्या काळामध्ये संवाद मात्र हरवलेला आहे ही खंत व्यक्त केली. स्वभाषेचा अभिमान बाळगताना इतर भाषांचा अपमान होणार नाही याचीही काळजी घेण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रा. पल्लवी वानखडे, प्रा. माधुरी खडसे प्रा. पायल कडू, प्रा. मनिषा पागृत ,प्रा. अंकिता गोरे, डॉ. प्रीती काळे, प्रा . सुमय्या शेख, प्रा . हर्षल लुंगे हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरिल हल्ल्याचा प्रहार कडून निषेध

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,(दि.11)**– भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई न्यायपिठावर असताना एका वकिलाने बूट भिरकावून केलेल्या भ्याड व अभद्र हल्ल्याचा चांदूर बाजार तालुक्याच्या प्रहार जनशक्ती पक्षाकडून तीव्र निषेध करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर पक्षाच्या शिष्टमंडळाने तहसीलदार चांदूरबाजार यांना निवेदन सादर करून संबंधित दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. निवेदनात म्हटले आहे की, हा हल्ला एखाद्या व्यक्तीवर नसून भारतीय संविधान, न्यायसंस्था आणि लोकशाही मूल्यांवर थेट आघात आहे. प्रहार जनशक्ती पक्षाने या घटनेची सखोल चौकशी करुन, दोषींविरुद्ध गुन्हा नोंदविणे, तसेच संबंधित वकिलांवर बार कौन्सिलमार्फत शिस्तभंगात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे. याशिवाय, न्यायपिठावरील सुरक्षा अधिक मजबूत करण्याची मागणीही करण्यात आली आहे.




निवेदनात पुढे नमूद करण्यात आले की, अशा विकृत विचारधारेचा प्रसार करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करून भविष्यातील घटनांना आळा घालावा. या निषेध व्यक्त करताना तालुका अध्यक्ष दिनेश आमझरे, प्रदीप बंड, संजय घोमकाडे, निलेश वाटाणे, निखिल ठाकरे, रितेश बंड आणि प्रज्वल पोहोकार उपस्थित होते.

# बोलायला सत्ताधारी, चकरा मात्र शासनदरबारी!

**सत्ताधाऱ्यांनाच द्यावे लागत आहे निवेदन | वरुड-मोर्शी मतदारसंघाची शोकांतिका**

महासागर | विलास पाटील

**वरुड,(दि.11)** – राज्यात सध्या भाजपप्रणीत महायुतीचं सरकार सत्तेवर आहे. या सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना हे घटक पक्ष आहेत. वरुड-मोर्शी मतदारसंघातही भाजपचे आमदार असून जिल्ह्याचे पालकमंत्रीदेखील भाजपचेच आहेत. एवढ्या सत्तेच्या बळावरही शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी भाजपच्याच कार्यकर्त्यांना प्रशासनाकडे निवेदन द्यावं लागतं, हीच या भागाची खरी शोकांतिका ठरते. बोलायला सत्ताधारी, मात्र तरीही यांना शासनदरबारी चकरा माराव्या लागतात, तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या वेदना कोण ऐकणार असा प्रश्न आता वरुड-मोर्शीच नव्हे तर संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांतून उमटू लागला आहे.

अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले असतानाही, वरुड-मोर्शीतील अनेक गावांना शासनाच्या अतिवृष्टीग्रस्त योजनेतून वगळण्यात आले. प्रशासनाच्या या बेपर्वाईविरोधात भाजप कार्यकर्त्यांनी 10 ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिल्यानंतरच वगळलेला भाग यादीत समाविष्ट करण्यात आला, हे शासनयंत्रणेच्या विलंबशाहीचे आणि असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण ठरते. मात्र या सर्व प्रकारातून 'शासनात असलेल्यांनाच शासन दरबारात धाव घ्यावी लागते, मग सामान्य शेतकऱ्याचे कोण ऐकणार?' असा प्रश्न जनमानसात गडद होत आहे. काही मोजक्या भागांना मदतीचा लाभ मिळाला असला, तरी उर्वरित शेतकरी अजूनही मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.



### भाजपेतर मित्र पक्षाला किंमत नाही ?

भाजपप्रणीत सत्तेत भाजप किंवा इतर मित्र पक्षाला किंमत नाही का? असा प्रश्न निर्माण होत आहे. जनतेने निवडून दिलेले आणि सत्तेत असलेल्यांच निवेदन द्यावे लागत आहे हा शासनाच्या संवेदनशीलतेचा पराभव नाही का? शासनाने वेळीच शेतकऱ्यांच्या वास्तवाकडे लक्ष न दिल्यास, हा आक्रोश जनआंदोलनाच्या रूपात उद्रेक होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे 1) ऋषिकेश रमेश मिल्खे 2) प्रफुल रमेशराव मिल्खे 3) क्रांती रमेशराव मिल्खे यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन : मौजे बडनेरा, प्रगणे बडनेरा, शेत सर्वे क्रं. 187/2, प्लॉट क्रं. 1, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे 1) ऋषिकेश रमेश मिल्खे 2) प्रफुल रमेशराव मिल्खे 3) क्रांती रमेशराव मिल्खे. यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी PNB HOUSING FINANCE LIMITED BR. AMRAVATI (Roshani) येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत दि. 15/09/2020 रोजीचे दस्त क्र. 3495 आणि दि. 16/12/2003 रोजीचे दस्त क्र. 3302 सदर दोन्ही मूळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

कोर्ट शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

# मनपा करणार ११ प्रमुख चौकांची पुर्नरचना

## वाहतूक सुलभता व पादचारी सुरक्षेला प्राधान्य

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

शहरातील वाढत्या वाहतुकीला सुसंगत वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासह पादचारी सुरक्षेत वाढ करण्याकरिता नागपूर महानगरपालिकेने शहरातील ११ प्रमुख चौकांचे पुर्नरचना काम हाती घेतले आहे. मनपा आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी शनिवारी (ता:११) या चौकाच्या सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. तसेच उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, कार्यकारी अभियंता रवींद्र बुंधाडे, राजेंद्र राठोड, उपअभियंता राहुल देशमुख आणि कनिष्ठ अभियंता आनंद लामसोंगे उपस्थित होते. आयुक्तांनी व्हीसीए चौक, अशोका हॉटेल चौक, लिबर्टी टॉकीज चौक, लक्ष्मीभुवन चौक, माटे चौक, अलंकार टॉकीज चौक, विद्यापीठ लायब्ररी चौक, वंजारी नगर पाणी टाकी चौक, जाधव चौक, अग्याराम देवी चौक मध्ये सुरू असलेल्या कामाची पाहणी करीत कामाबद्दल आवश्यक निर्देश दिले. तसेच काम नोव्हेंबर महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यांनी एस टी स्टँड जवळ वाहतुकीला अडथळा दूर करण्यासाठी एक बैठक घेण्याचेही निर्देश ही दिले.

वाहतुकीतील अडथळे कमी करून, चौकातील रचना सुधारून आणि सिग्नल व्यवस्थेत बदल करून वाहनांच्या हालचाली अधिक सुलभ करण्याचा या योजनेचा हेतू आहे. या चौकांमध्ये वाहतुक सुरळीत करण्यासाठी चौकांची रचना सुधारित केली जात आहे तसेच सिग्नलच्या वेळेत सुधारणा केली जाईल. चौकांची रचना करतांना वाहनांना सुलभतेने वळण घेणे तसेच चौक ओलांडताना वाहनांना व पादचाऱ्यांना कमी वेळ लागण्याच्या दृष्टीने संरचना करण्यात येत आहे. यामुळे अपघातांची शक्यता कमी होईल. या नव्या रचनेमुळे वाहतूक सुलभ होईलच, तसेच पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चौक ओलांडता येईल. यामुळे नागपूर शहरातील रस्ते अधिक प्रवासी-मैत्रीपूर्ण बनतील, असा मनपाचा प्रयत्न आहे. वाहतूक अभियंता वींद्र बुंधाडे यांनी सांगितले की, सुरक्षित व सुरळीत वाहतुकीकरीता चौकांची रचना करण्यात येत आहे. चौकांमध्ये सुधारित सिग्नल व्यवस्था, अधिक स्पष्ट पादचारी मार्ग आणि वाहन चालकांसाठी सुरक्षित दिशा दर्शक फलक लावले जाणार आहेत.

# नागपूर विद्यापीठाने एकाच दिवशी केले चार विश्वविक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

या भारतात बंधुभाव नित्य वसु दे या विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करीत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना नागपूर विद्यापीठाने आदरांजली अर्पण केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाजवळील मैदानावर विश्वविक्रमी कार्यक्रम शनिवार सकाळी पार पडला. यावेळी विद्यापीठाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसह एकूण चार विश्वविक्रमाची ऐतिहासिक नोंद केली.



कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, हास्य अभिनेता भारत गणेशपुरे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, आमदार डॉ. आशीष देशमुख, प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे), व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दिलेला करुणा, मानवता, बंधुभाव, एकात्मता, राष्ट्रप्रेम, तरुणांनी उद्योगी तरुण, वीर, शिलवान असावे हा संदेश विद्यार्थ्यांसह समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा या उद्देशाने या आगळ्यावेगळ्या आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या आवाहनाला विक्रमी साद दिली. उपक्रमात अतिशय कमी वेळेत प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद देत तब्बल एकूण ५२ हजारांपेक्षा अधिक नोंदणी करून या उपक्रमात सहभाग घेतला. यामध्ये १६ हजार पेक्षा अधिक प्रत्यक्ष उपस्थिती तर १५ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी डिजिटल प्लॅटफॉर्मवर सहभाग नोंदवत विश्वविक्रमाला गवसणी घातली. एकच गाणे गाणाऱ्या लोकांचा सर्वात मोघेतलानलाइन व्हिडिओ अल्बम या प्रकारात विद्यापीठाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवला. या प्रकारामध्ये यापूर्वी ५ हजार लोकांच्या एकत्रित गीत गायनाचा असलेला वर्ल्ड रेकॉर्ड विद्यापीठाने आज मोडला. एवढेच नव्हे तर तब्बल १५,४०२ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला.

# कै. गोविंद गणेश उपाख्य काकासाहेब चोळकर आणि कै. बाबासाहेब घटाटे पुण्यतिथी संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ११ :

विदर्भातील अनाथ, निराधार, निराश्रित मुलांच्या शिक्षण व संगोपनाचे कार्य विगत १०३ वर्षापासून करीत असलेल्या 'अनाथ विद्यार्थी गृह मंडळ', लकडगंज, नागपूर या संस्थेचे आद्य संस्थापक कै.पू.गोविंद गणेश उपाख्य काकासाहेब चोळकर यांची ७४ वी पुण्यतिथी व तद्वतच संस्थेचे जुने आश्रयदाते तथा भूतपूर्व अध्यक्ष कै.मा.ना. उपाख्य बाबासाहेब घटाटे यांची ३६ वी पुण्यतिथी नुकतीच पार पडली.



कै. काकासाहेब चोळकर सभागृहात संस्थाध्यक्ष श्री. जयंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळ्याप्रसंगी नागपूर येथील वक्ता तथा अभ्यासक वीरेंद्र देशपांडे,सचिव अंबरीश घटाटे ,संस्थेचे पूर्वाध्यक्ष अविनाश देशपांडे,कोषाध्यक्ष विजय देशपांडे आणि भूतपूर्व सचिव दत्तात्रय मुळे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये वीरेंद्र देशपांडे, संस्थेचे पूर्वाध्यक्ष अविनाश देशपांडे आणि सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रमोद मारोडकर यांनी संस्थेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत काकासाहेब चोळकर आणि बाबासाहेब घटाटे यांची जीवनी कथन केली.

संस्थेचे अध्यक्ष जयंत जोशी यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेऊन अनाथ विद्यार्थी गृहाच्या उभारणीसाठी सर्वांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका मधुरा जोशी यांनी केले. डॉ. पूनम चव्हाण यांनी पाहुण्यांचा परिचय आणि प्रास्ताविक केले तर डॉ. प्रदीप बिबटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला संस्थेमार्फत चालणाऱ्या शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक,संस्थेचे माजी विद्यार्थी,हितचिंतक, संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## सुप्रिया सुळे आज थडीपवनीत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष बंडूपंत उमरकर यांची १२ ऑक्टोंबर २०२५ ला प्रथम पुण्यतिथी आहे. हेच औचित्य साधून त्यांच्या अधार्कृती उद्याचं अनावरण करण्यात येणार आहे. याच कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे येणार असल्याची माहिती युवा नेते सलील देशमुख यांनी दिली. सकाळी 11 वाजता थडीपवनी येथील आर्ट अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या प्रांगणावर हा सोहळा होणार आहे. या सोहळ्यानिमित्त सत्यपाल महाराज यांचे कीर्तनाचा कार्यक्रम सुद्धा ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमाला माझी गृहमंत्री अनिल देशमुख, खासदार अमर काळे, डॉ. गिरीश गांधी, आ.अभिजीत वंजारी, हर्षवर्धन देशमुख यांच्यासह इतर मान्यवर सुद्धा उपस्थित राहणार आहे.

## नोकराने पळविले मालकाचे २.३५ लाख

**नागपूर :** मालकाचे २.३५ लाख रुपये घेऊन एक नोकर फरार झाला. ही घटना बजाजनगर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी निखिल वामन कोल्हेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. प्रथमेश शेखर राऊत (२०) रा. वैशालीनगर असे आरोपी नोकराचे नाव आहे. निखिलचे तात्या टोपेनगरात बॉस्किन अॅन्ड रॉबिन्स नावाने आईस्क्रीम पार्लर आहे. प्रथमेश व इतर युवक येथे काम करतात. दुकानात गोळा झालेल्या रकमेचा हिशेब आणि ती रक्कम बँकेत जमा करण्याचे काम प्रथमेशचे होते. जाण्यापूर्वी त्यांनी प्रथमेशला त्यांच्या मित्राकडून येणार असलेले उधारीचे २ लाख रुपये आणि गल्लूयातील ३५ हजार रुपये बँकेत जमा करण्यास सांगितले होते. प्रथमेशने गल्लूयातील ३५ हजार रुपये आणि निखिल यांच्या मित्राकडून घेतलेले २ लाख रुपये अशी २.३५ लाखांची रोकड घेतली आणि बँकेत जमा करण्यासाठी जात असल्याचे सांगून पार्लरमधून निघाला.

## जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग व नेचर ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून या निमित्याने प्रश्नमंजुषा स्पर्धा, पोस्टर कॉम्पिटिशन, फोटोग्राफी कॉम्पिटिशन व विद्यार्थ्यांकरिता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जागतिक प्राणी संग्रहालय शैक्षणिक सहल अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

वन्यजीवांचे संरक्षण तसेच पर्यावरणातील त्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे म्हणून वन्यजीव सप्ताह साजरा करण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी उद्घाटन समारंभातील अध्यक्षीय भाषणात सांगितले. प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनीषा भातकुलकर यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव तसेच निसगार्तील जैवविविधतेचा अभ्यास करण्याचे त्यांनी त्यांच्या प्रास्ताविकपर मार्गदर्शनात आवाहन केले. बक्षीस वितरण तसेच समारोपीय कार्यक्रमाकरिता प्रमुख अतिथी म्हणून डब्ल्यू.डब्ल्यू.एफ. इंडियाचे प्रकल्प अधिकारी श्री. अजिंक्य भटकर हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव संरक्षणाकरिता शास्वत पद्धतींचा विकास करण्याचा आग्रह केला. महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी. कॉर्डिनेटर डॉ. नरेंद्र घारड, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. गजानन झाडे, डॉ. मनीषा भातकुलकर, डॉ. नितीन कोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नेचर ग्रीन क्लब समन्वयक डॉ. अविनाश इंगोले यांनी केले तसेच प्रा. अश्विनी शेंडे हिने उपस्थितीतांचे आभार मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

# जागतिक स्तन कर्करोग जनजागृती दिनानिमित्त मेगा जागृती अभियान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

नागपुर प्रत्येक वर्षी १६ ऑक्टोबर रोजी साजरा होणाऱ्या जागतिक स्तन कर्करोग जनजागृती दिनानिमित्त, रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थ आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरात मेगा जनजागृती अभियान सुरू करण्यात येत आहे. या संदर्भात मनपा आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. आयुक्तांनी या अभियानाला सर्वोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. ही विशेष मोहीम मनपाच्या अमृत महोत्सवी वर्ष निमित्ताने आयोजित करण्यात आली असून, महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृती करणे, तसेच लवकर निदान आणि नियमित तपासणीचे महत्त्व अधोरेखित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

तसेच, नागपूरमधील अनेक प्रसिद्ध स्मारके गुलाबी रंगात उजळवली जाणार आहेत, ज्यामुळे या मोहिमेचे प्रतीकात्मक दर्शन होईल.या उपक्रमाद्वारे नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, महिलांना स्वतःच्या आरोग्याबाबत सजग राहण्याची प्रेरणा देणे हा मोहिमेचा हेतू आहे. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थचे अध्यक्ष रोटेरियन विनय दारा यांनी सांगितले,जनजागृती ही प्रतिबंधाची पहिली पायरी आहे.



# भारतीय मानक ब्यूरोतर्फे विश्व मानक दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

दरवर्षी १४ ऑक्टोबर रोजी संपूर्ण जगभरात विश्व मानक दिवस साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे १९४७ मध्ये झालेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय मानकीकरण कराराच्या स्मृतीचा सन्मान करणे, ज्याने आधुनिक औद्योगिक सहकार्य आणि एकसमान गुणवत्तेच्या प्रणालीची पायाभरणी केली. हा दिवस त्या तज्ञ, संस्था आणि संघटनांना आदर देण्यासाठी साजरा केला जातो, जे आंतरराष्ट्रीय मानक विकसित करून आणि अंमलात आणून आपले जीवन अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि गुणवत्तापूर्ण बनवतात.

या परंपरेला पुढे नेत, भारतीय मानक ब्यूरो, नागपूर शाखा कार्यालय यांच्यातर्फे विश्व मानक दिवस २०२५ चा विशेष कार्यक्रम १४ ऑक्टोबर २०२५ रोजी हॉटेल रॅडिसन ब्लू, नागपूर येथे आयोजित केला जात आहे. या कार्यक्रमाचे नेतृत्व हेमंत बी. आडे, संचालक, भारतीय मानक ब्यूरो, नागपूर शाखा कार्यालय करणार आहेत. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून डॉ. (प्रो.) प्रेम लाल पटेल, संचालक, विश्वेश्वरैया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर उपस्थित राहतील आणि आपल्या प्रेरणादायी विचारांची मांडणी करतील. या वर्षीचा विषय आहे "Shared Vision for Better World Spotlight of SDG 17: Partnferships for the Goals", ज्यातून हे स्पष्ट होते की आंतरराष्ट्रीय मानक केवळ नवकल्पना आणि उत्कृष्टतेला चालना देत नाहीत, तर टिकाऊ विकास आणि जागतिक प्रगतीसाठी भक्कम पाया देखील घालतात.

कार्यक्रमात "Shared Vision for Better World" या विषयावर तज्ज्ञांची पॅनेल चर्चा होईल, ज्यामध्ये उद्योग क्षेत्र आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी मानकीकरणाच्या आधुनिक प्रभावांवर चर्चा करतील. या प्रसंगी मानकीकरण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेल्या संस्था आणि व्यक्तींना गौरविण्यात येईल. तसेच, विद्यार्थ्यांसाठी आणि युवा व्यावसायिकांसाठी जागरूक तंत्राद्वारे मानकीकरणाचे महत्त्व आणि त्यातील करिअर संधी यांची माहिती दिली जाईल.

मानकीकरण हे आधुनिक जीवनातील गुणवत्ता आणि सुरक्षिततेचे मूलभूत अधिष्ठान आहे. हे उत्पादन आणि सेवांच्या विश्वासार्हतेत वाढ करते, जागतिक व्यापार सुलभ करते आणि नवकल्पना तसेच तंत्रज्ञान विकासाला चालना देते. आंतरराष्ट्रीय मानक देश आणि उद्योगांमधील सहकार्य अधिक बळकट करतात, ज्यामुळे आर्थिक प्रगती आणि ग्राहकांचा विश्वास वाढतो. विश्व मानक दिवस प्रथम १९७० साली साजरा करण्यात आला, ज्याद्वारे मानकीकरणाच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय कराराच्या स्मृतीला अभिवादन करण्यात आले. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये साजरा केला जातो आणि ISO, IEC आणि कळव सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या योगदानाचा सन्मान करण्याची संधी देतो. विश्व मानक दिवस हा केवळ मानकीकरणाच्या यशाचा उत्सव नाही, तर एक सामूहिक बांधिलकी आहे – उत्कृष्टता, सुरक्षितता आणि नवकल्पनांच्या माध्यमातून अधिक समन्वयित, टिकाऊ आणि प्रगत भविष्याच्या निर्मितीकडे वाटचाल करण्याचा संकल्प आहे.

## पिस्तूल, काडतूसांसह तरुणाला अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

वाडी पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर एका तरुणाला पिस्तूल घेऊन फिरताना अटक केली. झडतीमध्ये त्याच्याजवळ ५ जीवंत काडतूसही मिळाले. अल्केश प्रमोद गजभिये (२१) रा. धामना असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

गुरूवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास वाडी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान वडधामनाच्या इस्माईल लेआऊटमध्ये एक तरुण पिस्तूल घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांचे पथक परिसरात पोहोचले. एका पडक्या घरामध्ये पोलिसांना अल्केश मिळाला. झडतीमध्ये त्याच्याजवळ पिस्तूल आणि मॅग्झीनमध्ये ५ काडतूस मिळाले. पोलिसांनी आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून अल्केशला अटक केली. त्याने पिस्तूल कुठून आणली याचा शोध सुरू आहे. सध्या अल्केश वेगवेगळी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## नाईक तलाव सौंदर्यिकरणाचे काम अर्धवट असल्याने
# नागरिकांमध्ये असंतोष



महासागर
प्रभाग वार्ता

■ प्रदीप पौनिकर
नागपूर, दि. ११ :

प्रभाग क्र.२० च्या अंतर्गत येण्याऱ्या नाईक तलाव सौंदर्यिकरणाचे काम अर्धवट राहिल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. या कामाची पूर्तता होणे आवश्यक आहे जेणेकरून परिसराचे सौंदर्य वाढेल आणि नागरिकांना मनोरंजनाचे ठिकाण मिळेल. तलाव सौंदर्य करण्याचे काम अर्धवट राहिल्यामुळे परिसराचे सौंदर्य वाढले नाही. अर्धवट कामामुळे तलावाच्या आसपास अस्वच्छता निर्माण झाली आहे. तलावाच्या संरक्षण भिंतीचे काम अर्धवट राहिल्याने असामाजिक तत्वांच्या लोकांसाठी हे ठिकाण उघडे झाले आहे. या लोकांकडून गांजा, सिगारेट, दारू पिणे यासारख्या असामाजिक क्रिया केल्या जातात, ज्यामुळे परिसरातील नागरिकांना त्रास होतो. नागरिकांमध्ये या अर्धवट कामाबद्दल असंतोष पसरला आहे. मनपा प्रशासनाने तलाव आणि त्याच्या आसपासच्या परिसराची नियमित देखभाल केली पाहिजे. प्रशासनाने या कामाची पूर्तता करण्यासाठी कारवाई करावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे. मनपा प्रशासनाने तलाव सौंदर्यीकरणाचे काम त्वरित पूर्ण करावे. अन्यथा आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा स्थानिक नागरिक आणि आम आदमी पक्षाच्या वतीने देण्यात आला. यावेळी प्रदिप पौनिकर, विजय धकाते, चेतन निखारे, मिथुन निमजे, तेजराम साहू, सुरेश हेडाऊ, ललिता फुकटकर, दामू बारापात्रे,महेश पौनिकर, सुरेश काठीवाले, नितेश बांधेकर, सुरेश निखारे, तेजराम मदन, पंकज धकाते, श्रावण हेडाऊ, आशिष निनावे, सुखदेव हेडाऊ, पुरुषोत्तम बोकडे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# अग्रसेन चौकात खड्डा




■ प्रमोद जांभूळकर, नागपूर, दि. ११ :

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या गांधीबाग येथील अग्रसेन चौकात सध्या एक मोठा खड्डा नागरिकांच्या जिव्हारी लागत आहे. या खड्ड्यात पावसाचे पाणी साचल्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अग्रसेन चौक परिसरात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे आधीच रस्त्यांवर धूळधाण, अडथळे आणि वाहतुकीची कोंडी जाणवत असताना आता या खड्ड्यामुळे समस्या अधिकच गंभीर झाली आहे.

स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. खड्डा इतका खोल आहे की त्यात साचलेले पाणी बाहेरून दिसतच नाही. संध्याकाळी किंवा रात्री अपघात होण्याचा धोका खूप मोठा आहे,असे एका स्थानिक नागरिकाने सांगितले. वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा मार्ग दैनंदिन प्रवाशांसाठी जणू एक संकट ठरत आहे. प्रशासनाने त्वरित या खड्ड्याची दुरुस्ती करून नागरिकांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. अग्रसेन चौकात खड्डा; पाणी साचल्यामुळे नागरिक हैराण

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या गांधीबाग येथील अग्रसेन चौकात सध्या एक मोठा खड्डा नागरिकांच्या जिव्हारी लागत आहे. या खड्ड्यात पावसाचे पाणी साचल्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.अग्रसेन चौक परिसरात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे आधीच रस्त्यांवर धूळधाण, अडथळे आणि वाहतुकीची कोंडी जाणवत असताना आता या खड्ड्यामुळे समस्या अधिकच गंभीर झाली आहे.स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. खड्डा इतका खोल आहे की त्यात साचलेले पाणी बाहेरून दिसतच नाही. संध्याकाळी किंवा रात्री अपघात होण्याचा धोका खूप मोठा आहे,असे एका स्थानिक नागरिकाने सांगितले.

वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा मार्ग दैनंदिन प्रवाशांसाठी जणू एक संकट ठरत आहे. प्रशासनाने त्वरित या खड्ड्याची दुरुस्ती करून नागरिकांच्या समस्येकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

# श्री संताजी मंडळाचे कोजागिरी स्नेहमिलन उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

दत्तवाडी येथील श्री संत गजानन मंदीरात श्री.संताजी मंडळ डिफेन्स वाडी परिसर तर्फे कोजागिरी स्नेहमिलन कार्यक्रम शुक्रवार १० आक्टोंबर रोजी उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मंडळाचे सल्लागार पुरुषोत्तम रागीट, गोविंदराव रोडे, शैलेश थोराणे, राजेश थोराणे, वसंतराव इखनकर निशांत मदनकर, संदीप लांजेवार, पुरुषोत्तम लीचडे, मधुकर इखणकर, गोविंदराव रोडे, महेश चरडे, राजेश जिरापुरे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची विधिवत पूजा करून दूध व प्रसाद वितरण करण्यात आले. या वेळी लहान मुले व महिला वर्गाचे मनोरंजन आणि स्पर्धात्मक कार्यक्रम घेण्यात आले.



त्यात संगीत खुर्ची, रांगोळी, चित्रकला व जनरल नॉलेज प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आल्या प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना योग्य बक्षिसे देण्यात आले.

त्यानंतर समाज बांधवांचा सामुहीक स्नेहभोजाचा कार्यक्रम झाला सदर व कार्यक्रम यशस्वी करण्या करिता मंडळाचे अध्यक्ष चंद्रशेखर येनुरकर, सचिव सचिन थोराने, कार्याध्यक्ष सुमित चाफले, उपाध्यक्ष नीळकंठ कोचे, सहसचिव अरविंद निरगुळकर, कोषाध्यक्ष सुरज गिरडकर, लेखापरिक्षक अविनाश सालनकर व कार्यकारिणी सदस्य भारत केवटे, विजय नासरे, संजय बेलखोडे, पुरुषोत्तम इखार, प्रकाश घाटोळे, रविंद्र पारधी, भगीरथ ढवळे, किशोर सावरबांधे, अशोक राखडे, शिवानंद चीटकुलवार, गजानन तलमले आदींनी सहकार्य केले.

# हे मतांनी नव्हे तर बेईमानीने निवडून आलेले सरकार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
भाजप हा पूर्णपणे जातीवादी आणि विभाजनवादी पक्ष असल्याची टीका काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. भाजपचे उद्दिष्ट देशातील समाजात फूट पाडून, धर्म आणि जात याच्या आधारावर राजकारण करणे हेच असल्याचा आरोप त्यांनी केला.

या लोकांनी धर्माचे विष इतके मोठे पेरले आहे की, आज सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांवर जोडा फेकून मारण्याचे कृत्य होत आहे. यापेक्षा देशाचे अजून कोणते दुर्भाग्य असू शकते? असा तीव्र सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला.

त्यांनी केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक मोहन भागवत यांच्यावर थेट निशाणा साधत म्हटले की, या प्रकारामागे यांच्याच संस्कारांचा आणि विचारसरणीचा परिणाम आहे.

पटोले म्हणाले की, देशाचे सरन्यायाधीशांवर ज्या प्रकारे भ्याड हल्ला झाला, तो अत्यंत निंदनीय आहे. मात्र, या घटनेनंतर केंद्र सरकारने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झालेला नाही. हे सरकार मौन का बाळगतेय?

पंतप्रधान मोदी, मोहन भागवत आणि भाजपचे वरिष्ठ नेते का काही बोलत नाहीत? कारण हे कृत्य त्यांच्या माध्यमातूनच झाले आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस नेते पटोले यांनी केला. त्यांनी भाजपवर संविधान आणि न्यायव्यवस्थेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत लोकशाहीला धोका निर्माण होत असल्याचा इशाराही दिला.

पटोले यांनी महायुती सरकारवरही जोरदार हल्लाबोल केला. महायुतीचे सरकार हे जनतेच्या मताने नव्हे, तर बेईमानीने निवडून आलेले सरकार आहे. निवडणुकीदरम्यान जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते, पण सत्तेत आल्यानंतर हेच सरकार शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहे, असा आरोप त्यांनी केला.

राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत, कर्जाचा बोजा वाढत चाललाय, पण सरकार मात्र घोषणांवरच थांबले आहे, अशी टीका पटोले यांनी केली. भाजप आणि महायुती हे दोन्ही शेतकरीविरोधी आहेत. शेतकऱ्यांना मदत करू शकत नाही, तर निदान त्यांच्या वेदनांवर मीठ तरी चोळू नका, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अलीकडील वक्तव्यावरूनही मोठा वाद निर्माण झाला आहे. नाना पटोले म्हणाले की, जे लोक सत्तेवर येण्यासाठी शेतकऱ्यांना आश्वासन देतात, तेच आज त्यांना नाद लागल्याचे म्हणतात. हे अत्यंत लाजिरवाणे आणि शेतकरीविरोधी वक्तव्य आहे. त्यांनी पुढे सांगितले की, महायुतीने दिलेला जाहीरनामा फसवा होता. कर्जमाफीचे आश्वासन देऊन सत्तेत आलेल्या या सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होणारे राज्य आहे. राज्यातील परिस्थिती गंभीर असून, सरकार केवळ राजकारणात व्यस्त आहे. शेतकऱ्यांची दुःखं कमी करण्याऐवजी भाजप समाजात द्वेष आणि जातीयतेचे विष पेरत आहे.

संविधान, न्यायव्यवस्था आणि लोकशाही यांच्यावर हल्ला करणाऱ्या या विचारसरणीला जनता आता नक्कीच उत्तर देईल, असा इशारा देत पटोले यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

# मनपाच्या रंग दे नागपूर भित्तीचित्र स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद







### आयुक्तांच्या हातात कुंचला

महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी भित्तीचित्र स्पर्धेतील स्पर्धकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी चित्रकारांच्या चित्रकलेचे कौतुक केले तसेच शुभेच्छा दिल्या. यावेळी आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी कुंचला हातात घेऊन फिरविला. यावेळी उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सहाय्यक आयुक्त राजकुमार मेश्राम, मनपाचे जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, स्पर्धेचे समन्वयक अभिजीत मौंदेकर उपस्थित होते.

### विशेष बक्षिसे..

स्पर्धेतील विद्यार्थी गटातील विजेत्यांना १ लाख रुपयांचे पहिले बक्षीस, ७५ हजार रुपयांचे दुसरे बक्षीस आणि ५० हजार रुपयांचे तिसरे बक्षीस दिले जाणार आहे. तर व्यावसायिक गटातील विजेत्यांना १ लाख २५ हजारांचे पहिले बक्षीस १ लाख रुपयांचे दुसरे बक्षीस आणि ७५ हजार रुपयांचे तिसरे बक्षीस दिले जाणार आहे.

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित रंग दे नागपूर या भित्तीचित्र स्पर्धेला महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आलेल्या तरुण चित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या तरुण चित्रकारांनी नागपूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व नागपुरातील वारसा स्थळांचा नीरी मार्ग व फ्रिडम पार्कच्या भिंतींवर कुंचल्याच्या रंगातून नागपूरचा वैभवशाली इतिहास जिवंत केला. विशेष म्हणजे, चित्रकारांचा उत्साह वाढवीत आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी जुना मॉरिस कॉलेज टी पॉईंट ते मानस चौक दरम्यानच्या सीताबर्डी किल्ल्याच्या भिंती वर सुरू असलेल्या स्पर्धा स्थळी स्वतः चित्र रेखाटत स्पर्धेचे उद्घाटन केले.

मनपा आयुक्त यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती पंत यांच्या देखरेखीत 'रंग दे नागपूर' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या स्पर्धेला शनिवार पासून सुरूवात झाली आहे. ११ व १२ ऑक्टोबर या दोन दिवसात चित्रकार भित्तीचित्रे पूर्ण करणार आहेत. या माध्यमातून मनपाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचे आणि भविष्याचे दर्शन घडविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

१८ वर्षांवरील विद्यार्थी आणि व्यावसायिक अशा दोन गटात ही स्पर्धा घेण्यात येत असून, यात विद्यार्थी गटामध्ये बीएफए, एम एफ ए. एटीडी, गीडी फाईन आर्ट विद्यार्थी यांचा तर व्यावसायिक गटात हौशी चित्रकार आणि फाईन आर्टचे पदवीधर (उत्तीर्ण विद्यार्थी) यांचा समावेश आहे. स्पर्धेत सहभागी होत नागपूरसह मुंबई, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ, चंद्रपूर व वर्धा या जिल्ह्यातून आलेल्या चित्रकारांनी आपल्या कलेचे प्रदर्शन केले. या स्पर्धेसाठी एकूण ११८ गटांनी प्रवेशिका दिल्या होत्या. त्यापैकी ९२ जणांच्या प्रवेशिका मनपाने दिलेल्या संकल्पनेनुसार पात्र ठरल्या आहेत. प्रत्येक गटामध्ये ३ ते ५ चित्रकारांचा समावेश आहे. जवळपास तीनशेच्या वर चित्रकारांनी एकाचवेळी नागपुरातील या रंगोत्सवात सहभाग नोंदविला.

रंग दे नागपूर स्पर्धेसाठी १) 'नागपूर अॅट ७५': अनेक दशकांतील वाढीचा आणि परिवर्तनाचा प्रवास, २) 'स्वच्छ, हरित आणि स्मार्ट नागपूर': स्वच्छता, हिरवळ आणि स्मार्ट सिटी विकास, ३) नागपूरची संस्कृती, इतिहास आणि वारसा आणि ४) 'नागपूर- द टायगर कॅपिटल ऑफ इंडिया' या चार संकल्पना निश्चित करण्यात आल्या आहेत.

दीक्षाभूमीजवळील सुंदरलाल राय मार्ग (नीरी मार्ग), सीताबर्डीतील फ्रिडम पार्क येथील भिंतीवर तरुण चित्रकारांनी भित्तीचित्रे काढण्यास सुरुवात केली. नीरी मार्गावर विद्यार्थी तर फ्रिडम पार्कवर हौशी तसेच व्यावसायिक चित्रकारांनी भित्तीचित्रे काढली.

नागपुरातील शासकीय चित्रकला महाविद्यालय, अंजुमन कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, महालक्ष्मी जगदंबा कॉलेज, नटराज आर्ट अँड कल्चर कॉलेज, धरमपेठ, ऑरटॉनिक संस्था मानेवाडा, शासकीय चित्रकला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे.

नागपुरातील शासकीय चित्रकला विद्यालय, नटराज आर्ट अँड कल्चर कॉलेजमधील प्राध्यपकांनी तसेच इतर हौशी चित्रकारांनी यात सहभाग घेतला.

आर्णी (यवतमाळ) येथून प्रियंका प्रेम राठोड या स्पर्धेसाठी आल्या आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर शासकीय चित्रकला महाविद्यालयातील श्रद्धा सोनवणे, साक्षी पठारे, संकेत गायकवाड, गायत्री काळे व गौरव गवळी यांनी या स्पर्धेत भाग घेतला. ठाणे येथील चित्रकार सुरेंद्र कोहपरे यांनी या स्पर्धेत भाग घेतला.

सकाळपासून या दोन्ही ठिकाणी चित्रकार दाखल झाले होते. नागपूर महापालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त तयार केलेल्या टी शर्ट परिधान करून सर्व चित्रकार चित्र काढताना या मार्गावरून जाणारे वाहनचालक उत्सुकतेने पाहत होते तर काही जण थांबून सेल्फी काढताना दिसून आले.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या चित्रकारांनी महापालिकेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. नागपुरातील शासकीय चित्रकला महाविद्यालयातील प्रा. अश्विनी घुले म्हणाल्या, महापालिकेचा हा उपक्रम खूपच चांगला आहे. अमृत महोत्सवानिमित्त होत असलेला ही स्पर्धा केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर हौशी चित्रकारांसाठी सुद्धा नागपूरच्या विकासाला चित्रबद्ध करण्याची संधी मिळाली आहे.

**अभिनव संकल्पना – कोहपरे**

ठाणे येथून खास या स्पर्धेसाठी आलेले सुरेंद्र कोहपरे यांनी नागपूर महपालिकेची ही संकल्पना अत्यंत अभिनव असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. शहराच्या सौंदर्यीकरणासाठी असे उपक्रम राबविले जाणे चांगले तसेच चित्रकारांना सुद्धा आपल्या संकल्पांना मूर्त रुप देण्याची संधी अशा उपक्रमातून मिळत असल्याचे सांगितले.

नागपुरातील शासकीय चित्रकला महाविद्यालयात एमएफएच्या पहिल्या वर्षात शिकत असलेल्या प्रियंका प्रेम राठोड हिनेही या उपक्रमाचे कौतुक केले. चित्रकला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असे उपक्रम आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी महत्वपूर्ण ठरत असल्याचे सांगितले.

# गझल सम्राट सुरेश भटांवरील हिंदी पुस्तकाचे प्रकाशन व 'गीत गझल संगीत संध्या' चे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

*सारेच हे उमाळे आधीच योजलेले*
*सारेच हे जिव्हाळे आधीच बेतलेले*
*सांभाळतात सारे आपापली दुकाने*
*माझेच हे दिवाळे काढून लोकं गेले!*

सुरेश भटांच्या गझलेतील शब्द न शब्द अर्थपूर्ण आणि खोलवर विचार करायला भाग पाडणारे आहेत. मराठी रसिकांच्या मनावर त्यांनी अधिराज्य केले.

*जाताना सरणावर इतकेच मला कळले होते*
*मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते!*


या ओळीतून त्यांनी अनेकांच्या जीवनाचा आणि जगण्याचा अर्थ स्पष्ट केला. तेच कविवर्य सुरेश भट यांच्या गझलांवर आधारीत गीत गझल संध्या हा कार्यक्रम आज रविवारी रसिकांच्या काळजाचा ठाव घेणार आहे.

महासागर वृत्तपत्र समुहाच्यावतिने रविवार १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता बनयन हॉल, हिस्लॉप कॉलेज जवळ, चिटणवीस सेंटर, नागपूर येथे आयोजित कार्यक्रमात शाम जैन व श्रुती जैन आपल्या सुमधुर आवाजात सुरेश भट लिखीत गझलांचे सादरीकरण करतील.

तत्पूर्वी, गझल काव्यप्रकार मराठीत रूजवून रसिकांच्या हृदयाचा ठाव घेणारे गझल सम्राट सुरेश भट यांच्या गझलांना हिंदी विश्वात परिचित करण्यासह अंतरंग उलगडण्यासाठी त्यांचे शिष्य गझलकार प्रदीप निफाडकर यांनी लिहिलेल्या 'मराठी गझल के उस्ताद सुरेश भट और '.....या हिंदी पुस्तकाचे प्रकाशन मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष अक्षयकुमार काळे यांच्या शुभहस्ते होणार आहे. साहित्यप्रेमी डॉ. गिरीश गांधी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी सुरेश भट यांच्या हुबेहूब आवाजात प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर हे सुरेश भट यांच्या रचना सादर करतील.

*आयुष्य संपताना इतकीच खंत होती*
*काही भिकारड्यांना दिलदार मानले मी*
*माझ्या पराभवाची समजूत घातली मी*
*जे वार खोल गेले ते यार मानले मी!*

काळजाचा ठाव घेणाऱ्या अशा अनेक गझल श्रोत्यांना तृप्त करणार असून, कार्यक्रमाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महासागर परिवारातर्फे करण्यात आले आहे.



### महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनच्या अध्यक्षपदी
# प्रवीणसिंह परदेशी यांची निवड





■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ११ :
अमरावतीमध्ये होणाऱ्या ३८ व्या महाराष्ट्र राज्य तथा तिसऱ्या अखिल भारतीय पक्षीमित्र संमेलनाच्या अध्यक्षपदी राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण परदेशी यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र पक्षिमित्राचे किशोर गठडी यांनी दिली. अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेकडे यंदा यजमानपद आहे.

पक्षीमित्रांची संघटन असलेली महाराष्ट्र पक्षीमित्र ही संस्था राज्यात गेली चार दशके कार्यरत आहे. पक्षी अभ्यास, संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेची राज्यस्तरीय तसेच विभागीय स्तरावर पक्षीमित्र संमेलने होतात. अशा प्रकारचे संघटन आणि पक्षीमित्रांचे संमेलने घडवून आणणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याचे गठडी यांनी सांगितले.

छायाचित्रकार म्हणून छाप

संमेलनाध्यक्ष प्रवीणसिंह परदेशी हे त्यांच्या प्रशासकीय सेवेच्या सुरुवातीपासूनच वन्यजीव व पक्षी छायाचित्रकार व वन्यजीव संवर्धक म्हणून संपूर्ण राज्यात परिचित आहेत.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसन तसेच राज्याच्या वन विभागाचे सचिव असताना त्यांनी वन विभागात अतिशय धडाडीने काम करून जंगल व वन्यजीव संवर्धनात आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता.

महाराष्ट्र पक्षीमित्र सोबत ते गेल्या ३ दशकांपासून जुळलेले असून त्यांनी अनेक संमेलनात उपस्थित राहून संमेलनाच्या आयोजनात सुद्धा मोलाची भूमिका बजाविली होती. सध्या ते वन्यजीव क्षेत्रातील सर्वात जुन्या अशा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष सुद्धा आहेत.

संपूर्ण राज्यात आजवर ३७ राज्यस्तरीय संमेलने व विभाग स्तरावरील ३० संमेलनांचे आयोजन आजवर करण्यात आले आहेत. यावर्षी अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात १ आणि २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान हे संमेलन होत आहे.





■ नागपूर : *केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या मार्गदर्शनात पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपुर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नॉर्थ ईस्ट फेस्टिवल ऑक्टेवचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात, पूर्वोत्तर राज्यातील कलावंतांनी नृत्य सादर करीत सर्वांची मने जिंकली.*

दैनिक **महासागर**

आयोजित



स्व. सुरेश भट

स.न.वि.वि.

सुरेश भट महाराष्ट्राचे थोर गीतकार आणि मराठी विश्वात 'गझल' या लोकप्रिय विधेला जनमानसांपर्यंत पोचविणारे अफलातून व्यक्तिमत्त्व! स्व. सुरेश भट यांना १९७४ साली दैनिक महासागरच्या कार्यकारी संपादक पदावर आमंत्रित करुन त्यांना अमरावतीहून नागपुरला प्रस्थापित केले. त्यांच्या गझल प्रेमाचा बहर नागपूर शहरातच उगम पावला. आता या गझलेने मराठी साहित्य विश्वाला व्यापून टाकले आहे.

अशा गझल संप्रदायाचे आद्यगुरु सुरेश भट यांच्या गझलांना हिन्दी विश्वात परिचित करण्यासाठी त्यांचे अंतरंग शिष्य गझलकार **प्रदीप निफाडकर** यांनी **मराठी गझल के उस्ताद सुरेश भट और...** पुस्तक लिहिले असून ते हिन्दी साहित्य अकादमीने प्रकाशित केले आहे.

त्याचे प्रकाशन मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष माननीय **अक्षयकुमार काळे** यांचे शुभहस्ते संपन्न होईल. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यविश्व प्रेमी **डॉ. गिरीश गांधी** उपस्थित राहतील.

प्रकाशनानंतर **श्री. शाम जैन व श्रीमती श्रृती जैन** यांच्या सुमधुर गायनाचा गीत गझल संध्या हा कार्यक्रम होईल. भट यांच्या विविध गीतांच्या सोबतच भट यांच्या आठवणींना उजाळा देण्यात येईल.

हा कार्यक्रम **बनयन हॉल (Banyan Hall), चिटणवीस सेंटर, नागपूर येथे रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ६.३० वाजता** आयोजित केला आहे. आपण रसिक आहातच. उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

कार्यक्रम व्यवस्था
**Ruturang Entertainment**
**BHAKTI JADHAV PRODUCTIONS**

|| विनीत ||
श्रीकृष्ण चांडक   यू.एस. लाल   राहुल चांडक
आणि समस्त महासागर परिवार

## कबुतरांसाठी जैन मुनींची राजकारणात उडी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची राजकीय घडमोड समोर आली आहे. जैन मुनींनी आता चक्क राजकारणात उडी घेतली. जैन मुनी नीलेशचंद्र यांनी आज 'शांतिदूत जनकल्याण पक्षाची घोषणा केली. विशेष म्हणजे हा पक्ष आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत उमेदवार उभे करणार आहे.

जैन समाजाचे चिन्ह हे शांतिदूत कबुतर आहे. कबुतरांविरोधात जे आहेत, त्यांच्याशी आमचा वाद आहे. आमचा पक्ष केवळ जैन समाजाची पार्टी नाही, तर जेवढे मारवाडी, गुजराती आहेत. आम्ही एकत्र येत मुंबई मनपा निवडणुकीत उमेदवार उभे करणार आहोत, असा निर्धार जैन मुनी नीलेशचंद्र यांनी बोलून दाखवला. यामुळे अन्य पक्षात चिंता पसरली आहे.

